। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २३४ वा । शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी इरफान वहाब शेख, वय ३० वर्षे, रा.आपसिंगा रोड शिक्षक कॉलनी तुळजापूर ता.तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ४५,००० किंमतीची मोटरसायकल एस. बी. आय. बँक नळदुर्ग रोड तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी इरफान शेख यांनी दि.२७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### झोपडीमधून रोख रक्कम व मोबाईलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शैलेश आनंदराव बेले, वय ३९ वर्षे, रा. जवळी ता. पुसद जि. यवतमाळ ह.मु. रोसा ता. परंडा जि. धाराशिव यांचे रोसा शिवारातील सचिन जगताप यांचे शेतातील झोपडीमधून रोख रक्कम ३५,००० व मोबाईल फोन असा एकुण ४०,००० किंमतीचा माल हा दि.२६.११.२०२५ विजय रा. भोत्रा ता. परंडा व इतर तीन यांनी चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- शैलेश बेले यांनी दि.२६.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५(ए),३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत भिमराव रा. कास्ती ता. लोहारा जि. धाराशिव,नागनाथ सिद्रमा हिंगमीरे, वय ४३ वर्षे, रा. कास्ती खु ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५ रोजी . आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे रिक्षा क्र एमएच १२ क्युआर ५१७८, रिक्षा क्र एमएच १२ आर पी ०३७९ हे लोहारा ते कास्ती जाणारे रोडवर महाराष्ट्र ग्रामीण बॅक जवळ सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना लोहारा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये लोहारा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

तसेच परंडा पोलीस ठाणे: अंतर्गत विनोद रा.सोमवार गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव, दत्तात्रय रा. कवटे भिमनगर परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲपे रिक्षा क्र एमएच ०४ के ए ८८४६, पे रिक्षा क्र एमएच ४५ टी ३४१० हे ग्रामीण बैके समोर परंडा ते बार्शी जाणारे रोडवर परंडा येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## कृषी महाविद्यालयात ‘भूजल व्यवस्थापन आणि कृत्रिम पुनर्भरण’ विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- केंद्रीय भूजल बोर्ड, राज्य एकक कार्यालय पुणे यांच्या वतीने २७ नोव्हेंबर रोजी धाराशिव येथील तेर रोडवरील कृषी महाविद्यालयात भूजल व्यवस्थापन आणि कृत्रिम पुनर्भरण या विषयावर एकदिवसीय टियर-III प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ति किरण एस. पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विशेष मान्यवर अतिथी म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब बडगिरे, मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचे भूमी आणि जल व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. नितीन पाटील तर अध्यक्षस्थानी भूजल बोर्डाचे क्षेत्रीय निदेशकडॉ. उमेश बालपांडे हे उपस्थित होते.

या प्रसंगी कृत्रिम पुनर्भरण पद्धतींवर एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. तांत्रिक सत्रांमध्ये केंद्रीय भूजल बोर्ड, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आणि कृषी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केंद्रीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व महत्त्वाच्या भूजल विषयांचा आढावा घेतला. राज्य शासन कर्मचारी, कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, स्वयंसहायता गटातील महिला, उमेदच्या सदस्य, शेतकरी यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व सहभागींनी केंद्रीय भूजल बोर्डाच्या भूजल व्यवस्थापन संदर्भात जलसाक्षरता उपक्रमांबाबतच्या प्रयत्नांचे कौतुक केले. एकूण १३४ सहभागी या कार्यशाळेत उपस्थित होते.

## ढोकीत आढळला महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह: जिल्ह्यात आठवड्यातील दुसरी घटना

ढोकी (प्रतिनिधी)-महिलेचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह पेटवून विल्हेवाट लावण्याचा प्रकार धाराशिव तालुक्यातील ढोकी शिवारात आढळून आला आहे. गावापासून अडीच किलोमीटरवर रेल्वे फाटकानजिक जळालेल्या अवस्थेतील मृतदेह गुरुवारी सकाळी आढळून आला. दरम्यान, जिल्ह्यात असा जळालेला मृतदेह आढळण्याची आठवड्यातील ही दुसरी घटना आहे. यापूर्वी तुळजापूर तालुक्यातील अणदूर असा मृतदेह आढळला होता. या दोन्ही घटनांचा परस्पर संबंध आहे का, याचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.

ढोकीपासून धाराशिवला जाणाऱ्या रस्त्या नजीक उजव्या बाजूस अर्धवट अवस्थेत जळालेला महिलेचा मृतदेह आढळून आला. यावेळी येथील स्थानिकांनी ढोकी पोलिस ठाण्यात खबर दिल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे, पोलिस उपनिरीक्षक अनिल तांबडे व पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरा याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्राथमिक तपासानुसार घटना बुधवारी मध्यरात्रीच्या नंतर घडली, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु, सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुर असल्याने वाहनांची संख्या मोठी आहे. गर्दी कमी होण्याचा अंदाज घेत आरोपीने महिलेचा अन्यत्र खून करून मृतदेह येथे जाळल्याचा संशय व्यक्त होत आहे. महिला विवाहित असल्याचा प्राथमिक अंदाज असून महिलेचे वय १९-२३ वर्ष आहे.शरीर अर्धवट जळालेल्या अवस्थेत आहे. पायात पैंजण व जोडवे आहेत. आत दोन स्वतंत्र तपास पथके तयार करून ढोकी तसेच शेजारील हद्दीत तपास सुरू आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार तपास वेगाने करण्यात येत आहे तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहणी करण्यात येत असल्याचे एपीआय हजारे यांनी सांगितले.

शवविच्छेदनात पुरावे मृतदेहाचे शवविच्छेदन ढोकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार मृत महिलेच्या डोक्यावर गंभीर स्वरूपाचे आघात करण्यात आले.

त्यातच त्या महिलेचा मृत्यू झाला. घटनेनंतर धाराशिव येथील फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले. त्यांनी मृतदेहाची पाहणी करून परिसरातील त्यांना आवश्यक असलेल्या घटकाची पाहणी केली.

## तेर ग्रामीण प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस भरतीसाठी अर्ज मागवले

धाराशिव दि.२७ नोव्हेंबर (जिमाका) :एकात्मिक बालविकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्प तेर अंतर्गत धाराशिव तालुक्यातील ७ रिक्त पदांसाठी (अंगणवाडी सेविका व मदतनीस) संबंधित गावातील पात्र महिला उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज https://bhartiportal.zpdharashiv.in या संकेतस्थळावर २८ नोव्हेंबर २०२५ ते ११ डिसेंबर २०२५ या कालावधीत भरता येतील. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंट स्वाक्षरीसह,तसेच अपलोड केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या प्रती ११ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामीण) कार्यालय, तेर येथे जमा करणे अनिवार्य आहे.

विहित मुदतीत प्रिंट व कागदपत्रे न जमा केल्यास किंवा ऑनलाइन व प्रत्यक्ष सादर केलेल्या कागदपत्रांत तफावत असल्यास अर्ज नाकारला जाऊ शकतो. १)डकवाडी -- अंगणवाडी सेविका, २)बावी (ढोकी) -- अंगणवाडी सेविका, ३) तेर -- मदतनीस, ४) रुई (ढोकी) -- मदतनीस, ५) कोंड-- मदतनीस, ६) जहागिरदारवाडी - मदतनीस ७) तावरजखेडा --मदतनीस येथील पदासाठी ऑनलाईन अर्ज मागविले आहे.

भरती प्रक्रिया महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयांनुसार केली जाईल. कोणतीही परीक्षा किंवा मुलाखत नाही. १२ वी उत्तीर्ण ही किमान शैक्षणिक पात्रता; त्यापुढील शिक्षणानुसार अतिरिक्त गुण.

उमेदवार संबंधित गावची रहिवासी महिला असणे बंधनकारक आहे . तहसीलदार/सक्षम प्राधिकाऱ्याचे रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक. वयोमर्यादा: १८ ते ३५ वर्षे, तर विधवा उमेदवारांसाठी ४० वर्षे.एस सी/एस.टी उमेदवारांना ५ अतिरिक्त गुण, OBC/ NT/ VJ/ SEBC/ EWS उमेदवारांना ३ अतिरिक्त गुण;जाती प्रमाणपत्र अनिवार्य.

अंगणवाडी सेविका/मदतनीस म्हणून किमान २ वर्षे अनुभव असल्यास ५ गुण (फक्त शासकीय अनुभव ग्राह्य). कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती शासन नियमांनुसार सादर कराव्यात. विवाहित उमेदवारांसाठी माहेर व सासरच्या नावासंबंधी स्वघोषणापत्र आवश्यक. खोटी माहिती सादर केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

भरती प्रक्रिया स्थगित/बदल करण्याचा पूर्ण अधिकार बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण),तेर यांना राहील.उमेदवारांनी दिलेल्या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करून,अर्जाची प्रिंट व सर्व कागदपत्रे प्रत्यक्ष कार्यालयात जमा करावीत, अन्यथा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

## शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गणेश वय २५ वर्षे, रा. सानगुरुजी नगर उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५ रोजी सु.सानेगुरुजी नगर पाण्याचे टाकीजवळ उमरगा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक लोखंडी तलवार अंदाजे २०० किंमतीचे ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला उमरगा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-अमोल विकास जाधव, नेमणुक पोलीस ठाणे येरमाळा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह भा.न्या. सं.कलम २२३ मपोका अन्वये उमरगा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## ३६५ कारवाया करुन २,७०,४५० ‘तडजोड शुल्क’ वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२७ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३६५ कारवाया करुन २,७०,४५० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे. अशी माहिती पोलिसाकडून देण्यात आली आहे.

## जनावरे चोरणारे आंतरजिल्हा टोळीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद




धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधिक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार,याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यातील मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणेकामी रवाना होवून पेट्रोलींग करीत असताना तांत्रीक विश्लेषण व माहिती काढुन पो स्टे वाशी गुरनं ३९०/२०२५ कलम ३०३(२) बीएनएस हा गुन्हा रविंद्र उर्फ बुठा ठकसेन रायते, रा. फलटन याने त्याचे अन्य साथीदारासह केला असल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद व्यक्तीची माहिती काढुन शोध घेत असताना रविंद्र उर्फ बुठा ठकसेन रायते, वय ३३ वर्षे, रा. कणसे वस्ती, गुणवरे ता. फलटन जि. सातारा हा मिळुन आल्याने त्याचेकडे नमुद गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सुरवातीस उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यास अधिक विश्वासत घेवून चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे इतर साथीदार ऋषीकेश बिंटु जगताप, रा. गोखली ता. फलटन जि. सातारा व राहुल सुभाष सपकाळ, रा. सोनगाव ता. बारामती जि. पुणे असे तिघांनी मिळून केला असल्याचे सांगीतले. त्यावरुन पथकाने इतर दोघांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेतले. नमुदांनी गुन्ह्यामधील गेला माल तीन म्हशी याबाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरच्या म्हशी या रविंद्र उर्फ बुठा ठकसेन रायते याचे घरासमोरील असलेल्या झाडीमध्ये बांधुन ठेवलेल्या असुन त्या आज बारामती येथील बाजारात विक्रीसाठी घेवून जाणार आहोत असे सांगीतले. त्यावरुन पथकाने गुणवरे येथे जावून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या ०३ म्हशी व गुन्ह्यात वापरलेले वाहन पिकअप हे ताब्यात घेवून ०३ म्हशी व पिकअप वाहन असे एकुण ७,३०,०००किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरील कामगिरी श्रीमती रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद इज्जपवार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव, सचिन खटके, स.पो.नि., पोलीस हावलदार विनोद जानराव, नितीन जाधवर, पोलीस नाईक बबन जाधवर, चालक पोलीस हावलदार प्रशांत किवंडे यांचे पथकाने केली आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## जागतिक दिव्यांग दिन सर्व ग्रामपंचायती व शासकीय कार्यालयांत साजरा करण्याची प्रहार दिव्यांग संघटनेची मागणी



धाराशिव (प्रतिनिधी)- आगामी ३ डिसेंबर रोजी होणाऱ्या ‘जागतिक दिव्यांग दिना’निमित्त जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या, शासकीय कार्यालये, शाळा व महाविद्यालयांनी विशेष उपक्रम राबवावेत, अशी मागणी प्रहार दिव्यांग संघटना, धाराशिव जिल्हाध्यक्ष मयुर काकडे यांच्या पदधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात दिव्यांग व्यक्तींबाबत जनजागृती, त्यांच्या हक्कांची माहिती, विविध योजनांचा प्रसार आणि सामाजिक संवेदनशीलता वाढविण्यासाठी जिल्हास्तरावरून स्पष्ट निर्देश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

संघटनेने केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये : जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, शासकीय कार्यालये व शैक्षणिक संस्थांनी ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याचे आदेश द्यावेत.

जनजागृती कार्यक्रम, आरोग्य तपासणी शिबिरे, सन्मान समारंभ, तसेच दिव्यांग हक्क व योजना मार्गदर्शनाचे उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश द्यावेत.

दिव्यांगांच्या तक्रारी व मागण्यांसाठी विशेष तक्रार निवारण दिवस आयोजित करावा.

शासकीय कार्यालयांमध्ये रॅम्प, सुलभ प्रवेश, मार्गदर्शक फलक इत्यादी सुविधा तपासून आवश्यक सुधारणा कराव्यात.

या उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांच्या हक्कांचे संरक्षण, आत्मविश्वास वृद्धी आणि समाजातील सकारात्मकता वाढण्यास मदत होईल, असे संघटनेने नमूद केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या मागण्यांचा सकारात्मक विचार करून तातडीने आदेश जारी करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

सदरील निवेदन जिल्हाध्यक्ष मयुर काकडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाउपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, कार्याध्यक्ष महादेव खंडाळकर, शहराध्यक्ष जमीर शेख, जिल्हा सहसंघटक मेहबूब तांबोळी, तसेच प्रकाश खडके, सागर पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## एक अनोळखी पुरुष मयत आवस्थेत सापडला

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. १९.११.२०२५ रोजी पुर्वी फुलवाडी शिवारात पोगल सुतमिल इमारतीच्या बाजूस असलेल्या शंकरराव बोरकर यांच्या पडीक शेतामध्ये एक अनोळखी पुरुष मयत वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे यास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन डोक्यात कशानेतरी मारुन जिवे ठार मारुन पुराव नष्ट करण्याचे उद्देशाने त्याचा मृतदेह अर्धवट जाळुन पुरावा नष्ट केला आहे.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दिलीप मेघराज राठोड, नेमणुक पोलीस ठाणे नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे भा.न्या. सं.कलम १०३(१), २३८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महायुतीत तणावाचे चिन्ह!

एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात दोस्तीत कुस्ती सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे. अशातच आता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे एक वक्तव्य समोर आले आहे, ज्यात त्यांनी २ तारखेपर्यंत मला युती टिकवायची आहे असे म्हटले आहे. ज्यावर खासदार श्रीकांत शिंदेंनीही उत्तर दिले आहे. निलेश राणे यांनी स्टिंग ऑपरेशन करुन भाजपावर आरोप केल्यानंतर रविंद्र चव्हाण यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. वास्तविक राज्यात सत्ता ही एकनाथ शिंदे यांच्यामुळे मिळाली आहे. एकनाथ शिंदे यांनी जर एकजुटीने बंड केले नसते तर अजूनही महाराष्ट्रात भाजपाला सत्ता मिळविता आली नसती. मुख्यमंत्रीपदी उद्धव ठाकरे बनल्याने व शरद पवार व काँग्रेसचा भक्कम पाठींबा होता. अनेक दिवसापासून भाजपा सत्ता मिळविण्याचा विविध प्रयत्न करीत होता ही बाब तशी लपून नव्हती. अमित शहा यांचा सतत प्रयत्न होता. देशात दोन राज्य मोठे आहेत. एक महाराष्ट्र व दुसरा उत्तरप्रदेश, हे दोन राज्य ज्यांच्या हाती असतात त्यांची केंद्रात भक्कम सत्ता असते ही काही नवीन नाही. गतवेळी महाराष्ट्रात शिवसेना व भाजपा एकत्र विधानसभेची निवडणुक लढवुन सत्ता भाजपाला मिळविता आली नाही. यामुळे शरद पवार सारखे जुनी, जेष्ठ मंडळींनी उद्धव ठाकरे यांना सोबत घेवुन राज्याचे प्रमुख केले. त्यांच्या मुलास मंत्रीपद दिले. त्याच वेळी कोरोनासारखी महामारी जगात निर्माण झाली तरी उद्धव ठाकरे यांनी चांगली परिस्थिती हाताळली. त्यानंतर त्यांना आपले शिवसैनिक फुटणार नाहीत अशा भ्रमात राहीले. एकतर हिंदुत्वादी नसणाऱ्यासोबत उद्धवजी ठाकरे गेल्याने काही कट्टर शिवसैनिक नाराज होते. भाजपा परवडला मात्र काँग्रेस नको. अशी मानसिकता वाढत गेली. याचा लाभ भाजपाला झाला. शिवसेनेचा एक गट बाजूला झाला. यावर विविध टिका अजून ही होते. मात्र त्याच प्रसंगी उद्धव ठाकरे यांनी एक पाऊल मागे घेतले असते तर परिस्थिती बिघडली नसती. आपल्याच पायावर दगड मारून घेतला. त्यामुळे हातची सत्ता गेली. एकनाथ शिंदे यांच्याकडे कमी आमदार असताना देवेंद्र फडणवीस यांना डावलुन एकनाथ शिंदे यांना भाजपाच्या पक्षश्रेष्टींने मुख्यमंत्री केले. त्यांनी मुख्यमंत्री पदाची यशस्वी धुरा सांभाळली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेची निवडणुक लढवली व मोठे यश मिळविता आले. त्यामुळे भाजपाला सत्ता मिळविता आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहुन राज्यातील जनतेनी भाजपला अधिक जागा मिळवुन दिल्या. वास्तविक भाजपाला एकनाथ शिंदे यांच्यामुळे पाय रोवता आले. हे विसरून चालणार नाही. आता एकनाथ शिंदे जर जड वाट असले तर भाजपाने विचार केला पहिजे. एकनाथ शिंदे यांच्याकाळात लाडकी बहिण योजना चालू केली. याचा सकारात्मक परिणाम झाला. त्यामुळे सत्ता मिळविण्यात यश आले. नुकतेच एकनाथ शिंदे यांनी जाहिर सभेत जो पर्यंत एकनाथ शिंदे आहे तो पर्यंत लाडकी बहिण योजना बंद होणार नाही. ही घोषणा केली. त्यावेळी मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे होते, त्यामुळे महिलांचा विश्वास एकनाथ शिंदेवर असणे स्वाभाविक आहे. मुळात एकनाथ शिंदे हे शांत स्वभावाचे आहेत. कधीही त्यांनी वाचळ बोलले नाहीत. जसे राज्यात अजित पवार बोलतात, त्यामुळे वातवारण गरम होते. अजित पवार यांच्या पक्षातील सहकारी मंत्री बोलतात तसे एकनाथ शिंदे यांचे शिलेदार बोलत नाहीत. हा एक सकारात्मक परिणाम जनतेला दिसून येतो. राज्यात एकनाथ शिंदेवर अजूनही जनतेचा विश्वास आहे. जनतेचा विश्वासामुळे केंद्रात त्यांचे वजन आहे. राज्यात अजित पवार व एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत. केंद्रात एकनाथ शिंदे वजन अधिक आहे हे अनेक बाबीवरून दिसून येते. आज जर सहकारी नको वाटत असेल तर योग्य नाही. सध्याला मुंबई महानगरपालिका शिवसेनेकडेच राहावी असे वाटत असल्याने उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्याशी जुळवुन घेतले आहे. अनेकदा बैठका झाल्या, भेटीगाठी झाल्या अजून एकत्र आल्याची घोषणा झाली नाही. उद्याचालून या दोघासोबत एकनाथ शिंदे गेले तर निश्चित बदलाचे संकेत मिळतात. मुंबई ही शिवसेनेची मानली जाते. मुंबई ही हिंदुहृदयसम्राट बाळत्तसाहेब ठाकरे यांच्यामुळे मराठी माणसाची वाटते. तसे भाजपाचे नाही. भाजपाचे काही प्रमाणात गुजराती प्रेमामुळे संशयास जागा आहे. त्यामुळे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केलेले वक्तव्य अंगलट येऊ शकते. स्वबळावर तर सर्वांना लढावे वाटते. विजयी मिळतो का? याचा विचार केला जात नाही. काही वर्षापासून स्वबळावरची भाषा लोप पावली म्हणून काँग्रेसने राष्ट्रवादीसोबत आघाडी केली. शिवसेनेनी भाजपासोबत पंचवीसवर्ष युती केली. त्यामुळे पुन्हा स्वबळावर बोलणे संयुक्तीत वाटत नाही. मुळात निवडणुकीनंतर एकत्र येतात. महायुतीत किंवा महाआघाडीत सामिल होतात ही वेगळी बाब झाली. त्यामुळे आज जरी स्वबळावरची भाषा बोलली जात असली तरी आगामी काळासाठी ती यशस्वी होत नाही हे सत्य आहे. तसे पाहीले तर एकनाथ शिंदे बांधील नाहीत. उद्याचालून उद्धव ठाकरे सोबत घेऊ शकतात. दोघांचे विचार समसमान आहेत. हिंदुत्वादी आहेत. इतरांचे दोन डगरीवर हात असतो. तसे शिवसेनेचे दिसून येत नाही. आज प्रदेशाध्यक्ष शिंदे कोणत्या बाबीमुळे स्वबळावर लढण्याची भाषा बोलत असले तरी ते शक्य वाटत नाही. पाच ते दहा वर्षानंतर स्वबळावर शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या स्थितीत स्वबळावर सत्ता शक्य नाही. बिहारमध्ये भाजपाला अधिक जागा मिळवता आल्या तरी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा अग्रह धरला नाही. त्यांना माहिती आहे की, सत्तेसाठी बहुमतासाठी जो आकडा लागतो तो महत्वाचा आहे. पुर्वीपेक्षा प्रगती होत आहे ही समाधानाची बाब आहे. महाराष्ट्रात अजून भाजपाला स्वबळासाठी परिश्रम घ्यावे लागतील. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोणाच्याबाजून जनतेनी कौल दिला यावर बरेच आवलंबून आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील निकाल हे आगामी दिशा ठरविणारे आहेत. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष शिंदे यांचे वक्तव्य हे स्वता:चे असू .शकतात. भाजपा पक्ष श्रेष्टी कदापी असे वक्तव्य करेल असे वाटत नाही. अजूनही भाजपाला साथ एकनाथ शिंदे व अजित पवार या दोन पक्षाचा पाठींबा आहे म्हणून स्थैरता आहे. हे विसरून चालणार नाही.

# राजेश अग्रवाल महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव



मुंबई, दि. २८ : सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार हे येत्या ३० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून राजेश अग्रवाल त्यांच्याकडून ३० नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारतील.

**राजेश अग्रवाल यांचा अल्प परिचय**

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे.

राजेश अग्रवाल यांनी सेवाकाळात सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी आणि मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे) (व्यय - अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.

# आहारात समाविष्ट करा ‘हे’ १० पदार्थ, औषधांशिवाय वाढेल हिमोग्लोबिन



जर तुमच्या रक्तात लोहाची कमतरता असेल तर शरीराला अनेक आजार होऊ शकतात. यामुळे शरीर कमकुवत होऊ शकते. लोहाच्या कमतरतेमुळे अशक्तपणा होऊ शकतो. शरीरात लोह, फॉलिक ॲसिड आणि व्हिटॅमिन बी च्या कमतरतेमुळे आपल्या हिमोग्लोबिनची पातळी कमी होते. ज्यामुळे आपल्याला थकवा आणि अशक्तपणा जाणवतो.

इतकेच नव्हे तर हिमोग्लोबिनची पातळी कमी असल्याने आपल्या मूत्रपिंडातही समस्या निर्माण होऊ शकतात. परंतु, तुम्ही तुमच्या आहारात अशा अनेक गोष्टी वाढवून हिमोग्लोबिनची कमतरता भरून काढू शकता. तुमच्या आहारात सॅलड, हिरव्या भाज्या, फळे आणि काजू यांचा समावेश करून लोहाची कमतरता दूर करता येते.

आहारात समाविष्ट करा हे १० पदार्थ, औषधांशिवाय वाढेल हिमोग्लोबिन

ओपन पोर्समुळे चेहऱ्यावरचा ग्लो कमी झालाय? ‘हे’ सोपे घरगुती उपाय बनवतील एकदम गुळगुळीत

**अंजीर–**

अंजीरमध्ये व्हिटॅमिन ए, बी१, बी२, कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, मँगनीज, सोडियम, पोटॅशियम आणि क्लोरीन आढळतात. रात्री दोन अंजीर पाण्यात भिजवून, सकाळी त्याचे पाणी पिऊन आणि अंजीर खाऊन हिमोग्लोबिनची पातळी वाढवता येते.

**गूळ आणि शेंगदाणे–**

दररोज शेंगदाण्यामध्ये गुळ मिसळून सेवन करा. ते चावून खाल्ल्याने रक्त कमी होणार नाही आणि हिमोग्लोबिनची पातळी वाढेल.

**लिंबू–**

लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे शरीरात हिमोग्लोबिन वाढते.

**डाळिंब–**

मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन सी व्यतिरिक्त, डाळिंबामध्ये लोह देखील चांगल्या प्रमाणात असते. एका ग्लास कोमट दुधात दोन चमचे डाळिंब पावडर टाकून ते प्यायल्याने हिमोग्लोबिन वाढवता येते.

**सफरचंद–**

ॲनिमियासारख्या आजारांमध्ये सफरचंद खूप फायदेशीर आहे. याचे सेवन केल्याने शरीरात हिमोग्लोबिन वाढते.

**पालक–**

हिमोग्लोबिनची कमतरता असल्यास, पालक खाल्ल्याने शरीरातील कमतरता भरून निघण्यास मदत होते. पालकामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असते.

**बीट–**

बीट खाल्ल्याने हिमोग्लोबिन वाढते. यासोबतच, जर तुम्ही बीटची पाने खाल्ली तर तुम्हाला जास्त लोह मिळेल. त्याच्या पानांमध्ये बीटपेक्षा तीन पट जास्त लोह असते.

**आवळा आणि जांभूळ–**

आवळा आणि जांभळाचा रस समान प्रमाणात पिल्याने हिमोग्लोबिनची पातळी वाढते.

**पिस्ता–**

पिस्तामध्ये ३० वेगवेगळ्या प्रकारची जीवनसत्त्वे आढळतात. त्यात भरपूर लोह देखील असते.

# ओपन पोर्समुळे चेहऱ्यावरचा ग्लो कमी झालाय? ‘हे’ सोपे घरगुती उपाय बनवतील एकदम गुळगुळीत



प्रत्येकाच्या त्वचेत छिद्र असतात. ज्यामुळे त्वचा हायड्रेट राहते आणि अतिरिक्त तेल आणि घाम देखील निघून जातो. परंतु कधीकधी हे छिद्र मोठे होतात जे केवळ कुरूपच दिसत नाहीत तर त्वचेशी संबंधित अनेक समस्या निर्माण करू लागतात.

तेल आणि घाण अनेकदा उघड्या छिद्रांमध्ये जमा होते. ज्यामुळे चेहऱ्यावर लहान मुरुमे आणि पुरळ येतात. याशिवाय, उघडे छिद्र देखील चेहऱ्यावर चांगले दिसत नाहीत.

ओपन पोर्समुळे चेहऱ्यावरचा ग्लो कमी झालाय? हे सोपे घरगुती उपाय बनवतील एकदम गुळगुळीत

ज्या लोकांच्या चेहऱ्यावर जास्त उघडे छिद्र असतात. त्यांचा मेकअप त्यांच्या चेहऱ्यावर व्यवस्थित राहत नाही. चेहऱ्यावर उघडे छिद्र असण्याची अनेक कारणे असू शकतात. घरगुती उपायांचा वापर करून ओपन पोर्स कसे दूर करायचे ते जाणून घेऊया.

आहारात समाविष्ट करा ‘हे’ १० पदार्थ, औषधांशिवाय वाढेल हिमोग्लोबिन

**दह्याचा वापर–**

चेहऱ्यावरील अनेक समस्या दूर करण्यासाठी दह्याचा वापर केला जातो. उघड्या छिद्रांमध्येही दह्याचा वापर फायदेशीर ठरतो. यासाठी तुम्हाला जाड दही लागेल. आठवड्यातून किमान ३ ते ४ वेळा चेहऱ्यावर दही लावावे. याचा वापर केल्याने ओपन पोर्सची समस्या कमी होईल.

**मुलतानी माती–**

खुल्या छिद्रांवर उपचार करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर प्रभावी ठरतो. यासाठी २ चमचे मुलतानी माती पावडर घ्या आणि आवश्यकतेनुसार गुलाबजल घालून पेस्ट तयार करा. या फेस पॅकमध्ये तुम्ही ताज्या गुलाबाच्या पाकळ्यांची पेस्ट देखील घालू शकता. आठवड्यातून किमान ५ वेळा मुलतानी मातीचा फेस पॅक वापरल्यास तुम्हाला फरक दिसू लागेल.

**टोमॅटो टोनर–**

उघडे छिद्र कमी करण्यासाठी तुम्ही घरी टोनर बनवू शकता. हे करण्यासाठी, तुम्हाला १ काकडीचा रस आणि १ टोमॅटोचा रस लागेल. दोन्ही एकत्र मिसळा, स्प्रे बाटलीत भरा, फ्रीजमध्ये ठेवा आणि दररोज सकाळी आणि संध्याकाळी चेहऱ्यावर चांगले लावा. जर तुमच्याकडे स्प्रे बाटली नसेल तर तुम्ही कापसाच्या मदतीने हे टोनर तुमच्या चेहऱ्यावर लावू शकता.

**बर्फाचा वापर–**

उघड्या छिद्रांना कमी करण्यासाठी बर्फाचे तुकडे वापरणे देखील प्रभावी ठरते. टोमॅटोचा रस, काकडीचा रस, बटाट्याचा रस इत्यादी वापरून तुम्ही घरी बर्फाचे तुकडे देखील बनवू शकता. ते कापसाच्या कपड्यात गुंडाळा आणि सुमारे ५-१० मिनिटे चेहऱ्यावर मसाज करा. दररोज असे केल्याने ओपन पोर्सची समस्या कमी होते.

**कडुलिंब–**

पोषक तत्वांनी समृद्ध आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असलेले कडुलिंबाचे पान ओपन पोर्सची समस्या देखील कमी करू शकते. यासाठी ताज्या कडुलिंबाच्या पानांची पेस्ट बनवा आणि त्यात १ चमचा मध मिसळा. ही पेस्ट चेहऱ्यावर १० ते १२ मिनिटे लावा आणि नंतर स्वच्छ पाण्याने धुवा. कडुलिंबाच्या पानांच्या पॅकने उघड्या छिद्रांची समस्या कमी होईल आणि चेहराही चमकेल.

# तुमच्या या ३ चुका खराब करेल तुमचा मोबाईल, आजच सुधारा या सवयी



स्मार्टफोन असणे ही काही मोठी गोष्ट नाही, मोठी गोष्ट म्हणजे तुम्ही तुमच्या मोबाईलची काळजी कशी घेता फोनची योग्य काळजी घेतली नाही, तर स्मार्टफोन खराब होऊ शकतो. आज आम्ही तुम्हाला अशा चुकांबद्दल सांगणार आहोत, ज्या तुम्ही जाणूनबुजून किंवा नकळत करता, ज्यामुळे तुमचा फोन हळूहळू खराब होऊ लागतो.

तुमचा मोबाईल खराब झाला, तर काय होईल हे तुम्हाला माहीत आहे, फोन दुरुस्त करण्यासाठी तुम्हाला पैसे खर्च करावे लागतील, ज्यामुळे तुमचे बजेटही बिघडू शकते. हे होण्यापासून रोखण्यासाठी, स्मार्टफोनचे आयुष्य कमी करणाऱ्या चुकांबद्दल जागरूक असणे आवश्यक आहे.

या चुका करणे टाळा

पहिली चूक: दिवसभर फोन वापरल्यानंतर, जेव्हा दिवस संपतो, तेव्हा फोनची बॅटरी फारच कमी उरते. फोनमधील बॅटरी कमी असल्याने अनेकजण झोपण्यापूर्वी फोन चार्जिंगला लावतात आणि सकाळी उठल्यावर फोन चार्ज होईल या विचाराने झोपी जातात. पण तुमच्या या छोट्याशा निष्काळजीपणाचा हळूहळू तुमच्या फोनच्या परफॉर्मन्स आणि बॅटरी लाइफवर परिणाम होऊ लागतो आणि हळूहळू तुमचा फोन खराब होऊ लागतो.

दुसरी चूक: बरेच लोक सकाळी फोन चार्ज करतात आणि विचार करतात की चार्जर आणि केबलची काय गरज आहे पण फोनच्या अतिवापरामुळे बॅटरी कमी व्हायला लागली की मग ऑफिसमध्ये किंवा तुम्ही कुठेही असाल, तुमच्या ओळखीच्यांना त्यांच्या मोबाईलचा चार्जर आणि केबल विचारतात. पण या चुकीमुळे तुमचा फोन खराब होऊ शकतो, फक्त फोनसोबत येणारा मूळ चार्जर आणि केबल वापरा.

तिसरी चूक: जर तुम्हाला मोबाईलमध्ये एखादे ॲप डाऊनलोड करायचे असेल, पण ते ॲप गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअरवर सापडत नसेल, तर बरेच लोक त्या ॲपचे नाव टाकून गुगलवर सर्च करतात. शोध परिणाम दिसल्यानंतर, लोक कोणत्याही अज्ञात साइटवरून एपीके फाइल डाउनलोड करण्याची आणि विचार न करता डिव्हाइसवर ॲप इंस्टॉल करण्याची चूक करतात. पण तुमची ही सवय तुमचा फोन खराब करू शकते, अज्ञात साइटवरून इन्स्टॉल केलेल्या ॲप्समध्ये व्हायरस किंवा मालवेअर असू शकतात, जे फोनला हानी पोहोचवू शकतात.

# जर तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर लाज न बाळगता करा या ४ गोष्टी




यश कोणाला आवडत नाही तथापि, यश मिळवणे इतके सोपे नाही. कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात यशस्वी होणे म्हणजे त्याची स्वप्ने पूर्ण करणे एवढेच नाही, तर ते तुमच्या जीवनाचा दर्जा उंचावण्यासही मदत करते आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे यशामुळे आदरही वाढतो, पण यश सर्वानाच मिळते असे नाही. खरे तर यशस्वी होण्यासाठी यशाच्या मागे कसे धावायचे हे माहित असणे आवश्यक आहेष्ठ

यशस्वी लोकांकडे बघून, त्यांचे जीवन किती चांगले आहे असे वाटते, परंतु त्यांच्यासारखे जीवन मिळविण्यासाठी आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतात. चला तर मग जाणून घेऊया अशी तीन कामे जी यशस्वी होण्यासाठी खूप महत्त्वाची आहेत.

काही शिकायला लाजू नका

जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट शिकत असाल, तेव्हा तुम्ही तुमच्या शिक्षकांना त्या विषयाशी संबंधित प्रत्येक प्रश्न कोणताही संकोच आणि लाज न बाळगता विचारला पाहिजे. जर तुम्हाला काही समजत नसेल, तर ते पुन्हा पुन्हा विचारा. जे लोक शिक्षण घेताना किंवा काहीही शिकत असताना प्रश्न विचारण्यात लाजतात, त्यांना नीट शिकता येत नाही आणि त्यामुळे यशाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

पैशाच्या व्यवहाराचा साफ ठेवा हिशेब

कोणत्याही व्यक्तीने वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन वेगळे ठेवणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्याचप्रमाणे पैशाच्या व्यवहाराचे खाते देखील पूर्णपणे स्वच्छ ठेवले पाहिजे आणि ते नातेसंबंधांपासून वेगळे ठेवणे चांगले आहे. पैशाच्या व्यवहारात लाजाळू असणाऱ्या लोकांना अनेकदा नुकसान सहन करावे लागते.

कामाची जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करू नका

यशस्वी होण्यासाठी, कामाची जबाबदारी घेणे शिकणे खूप महत्वाचे आहे. स्वत:ला लीडर म्हणून सादर करा. कोणतेही काम करताना संकोच नसावा. यासाठी तुम्हाला कोणाची मदत घ्यावी लागत असेल, तर त्यातही लाजू नये. पुढे जाण्याची ही पायरी आहे.

नेटवर्क बनवण्यात अजिबात संकोच करू नका

यशस्वी होण्यासाठी तुमचे नेटवर्क चांगले असणे महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे वैयक्तिक जीवनात नातेसंबंध गरजेच्या वेळी उपयोगी पडतात, त्याचप्रमाणे व्यावसायिक जीवनात प्रगती करण्यासाठी तुम्ही लोकांशी चांगले संबंध राखणे महत्त्वाचे आहे. काही लोक फक्त कामात गुंतलेले असतात, पण जर तुम्हाला पुढे जायचे असेल तर काम ासोबत तुम्ही तुमचे नेटवर्क मजबूत करणे देखील महत्त्वाचे आहे.

# घोळ मिटता मिटेना!

निवडणूक आयोगाचा पारदर्शक कारभार अपेक्षित आहे. आयोगाकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक साधनांच्या साहाय्याने मतदार याद्यांत अचूकता आणणे शक्य आहे. स्थानिक पातळीवर नागरिक आणि स्वायत्त संस्थांनाही यात सहभागी करून घेता येईल.
मतदार नोंदणीची अचूकता तपासण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. आगामी काळात काही राज्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्या राज्यात विशेष मतदार यादी सुधारणा मोहीम (एसआयआर) राबवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या अर्जावरील सुनावणी दरम्यान न्यायालयाने हा निर्वाळा दिला आहे; मात्र यामुळे मतदार याद्यांमध्ये आढळणाऱ्या उणिवा क्षम्य ठरत नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवे. पश्चिम बंगालमध्ये तर विशेष मतदार यादी सुधारणा प्रक्रियेवरून तेथील ममता बॅनर्जी यांचे सरकार आणि निवडणूक आयोग एकमेकांसमोर उभे ठाकल्याचे चित्र निर्माण झाले आहे. एसआरआय प्रक्रिया राबवताना आतापर्यंत ३० ते ३५ जणांचे मृत्यू झाले आहेत. त्यावरून ममता यांनी निवडणूक आयोगाने राज्यात अनागोंदी निर्माण केल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे मतदार यादीतील घोळावरून राजकारणही तापले आहे. मतदारांची नावे वेगवेगळ्या प्रभागात नोंदवली जाणे, काहींची नावे वगळली जाणे, एकाच मतदाराचे नाव १०३ वेळा मतदार यादीत नोंदवले जाणे असे अनेक प्रकार उघड होत आहेत. या चुकांची जबाबदारी स्वीकारण्याचीही निवडणूक आयोगाची तयारी दिसत नाही. दुरुस्तीसाठी मतदारांनीच पुढे येणे निवडणूक आयोगाला अपेक्षित आहे. विरोधी पक्षांच्या वतीने महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी महापालिका निवडणुकीत निर्दोष मतदार यादी देण्याची मागणी करण्यात आली आहे, ती चुकीची म्हणता येणार नाही. पुण्याच्या मतदार यादीत ३ लाख दुबार मतदार नोंदवले गेले असतील तर त्याचा दोष शेवटी निवडणूक यंत्रणेकडेच जातो.

पारदर्शकता महत्त्वाची

निवडणूक प्रक्रियेवरील मतदारांचा अबाधित विश्वास लोकशाहीचा पाया आहे; मात्र गेल्या काही वर्षांत मतदार याद्यात दिसणाऱ्या त्रुटी, घोळ आणि अनियमिततेमुळे लोकशाहीवरच अविश्वासाचे ढग जमा होऊ लागले आहेत. प्रगल्भ लोकशाहीत निवडणूक आयोग निष्पक्षपाती असणे आवश्यक आहे; मात्र निवडणूक आयोगच संशयाच्या भोवऱ्यात सापडला असेल तर राजकारण गढुळले जाण्याचा धोकाही संभवतो. मतदानाच्या दिवशी मतदार यादीत नाव नसणे, स्थलांतरित झालेली, मृत व्यक्तींची नावे न वगळली जाणे यांसारखे प्रकार आढळतात. यामागे प्रशासनाचा बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणाच दिसून येतो; पण काही विशिष्ट भागातील विशिष्ट मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जाण्यामागे राजकारण असल्याचा संशय बळावतो. लोकशाही संख्येवर नाही तर प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर उभी असते; परंतु निवडणूक प्रक्रियाच अविश्वासाच्या धुक्यात हरवली तर कोणत्याही निकालाचे औचित्य प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरते. मतदार यादीतील त्रुटीची चर्चा होताना पहिले बोट निवडणूक आयोगाकडेच जाते.
आयोग देशात सर्वांत मोठी निवडणूक यंत्रणा राबवतो. म्हणून त्यांची जबाबदारी निः संशय आहेच. मात्र त्यासाठी आयोगालाच एकट्याला जबाबदार धरणे अन्यायाचे ठरेल. मतदार यादीची आखणी ही तीन स्तरांवर चालणारी प्रशासकीय प्रक्रिया आहे. निवडणूक आयोग, राज्य निवडणूक यंत्रणा आणि बूथ लेव्हल अधिकारी, तहसील, जिल्हाधिकारी यंत्रणा अशी ही त्रिस्तरीय यंत्रणा आहे.



निवडणूक आयोग घटनात्मक संस्था असल्याने ती स्वायत्त हवीच, मात्र आयोगाचे अधिकारी संसाधने, आर्थिक तरतुदी, कर्मचारी हे शासनमार्गेच येतात. त्यामुळे आयोगावर प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष दबावाची शक्यता उरतेच. प्रत्यक्ष सरकारकडून नसला तरी इच्छित परिणाम साध्य करू पाहणाऱ्या राजकीय पक्षाकडून आयोगावर दबाव असू शकतो. यातूनच एखादा पक्ष त्यांच्या मतदाराचे नाव वगळल्याची तक्रार करतो, दुसरा पक्ष बनावट मतदार असल्याची तक्रार करतो, एखादा पक्ष आणखी वेगळेच आक्षेप घेतो. यातून आयोगाचे निर्णय आधीपेक्षा जास्त तपासले जात आहेत, आयोगाच्या प्रत्येक कृतीचा राजकीय अर्थ लावला जात आहे. निवडणूक आयोगाची निष्पक्षता, राज्य यंत्रणेचा काटेकोरपणा आणि नागरिकांचा सहभाग यातूनच लोकशाही मजबूत होऊ शकेल.

# महिलांसाठी योग – एक आनंदाची पर्वणी

महिलांसाठी फॅशन आणि सौंदर्य उत्पादने
शेतीविषयक उपकरणे आणि उत्पादने
स्थानिक बातम्या
प्रादेशिक पर्यटन स्थळांच्या सहली
मी योगिनी : डॉ. वैशाली दाबके

हे शीर्षक वाचून खूप बरं वाटतं. कारण आनंद कुणाला नको आहे? परंतु असेही वाटेल की योग हा केवळ महिलांसाठी आनंदाची पर्वणी आहे का? इतरांसाठी नाही? असं निश्चितच नाही. योगसाधना सर्वांसाठी आनंद देणारीच आहे; परंतु एकूण स्वास्थ्याचा विचार करता, पुरुषांचं स्वास्थ्य आणि महिलांचं स्वास्थ्य यांचा वेगळा विचार करणं आवश्यक आहे. महिलांसाठी योगसाधना थोडी वेगळी आहे. इतकंच नव्हे तर अत्यावश्यक आहे.
निसर्गतः महिलांची शारीरिक रचना, मानसिक जडणघडण पुरुषांपेक्षा वेगळी आहे. स्थित्यंतरांचा कठीण काळ – एकूण जीवनकालात महिलांना अनेक स्थित्यंतरांना सामोरं जायला लागतं. पौगंडावस्थेत होणारी ऋतुप्राप्ती, त्यानंतर विवाह, गर्भारपण, प्रसूती, ऋतुनिवृत्ती या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीच्या शरीरात अनेक बदल होत असतात. यात मुख्य बदल होतात ते संप्रेरकांचे म्हणजेच हार्मोन्सचे. विविध अंत:स्त्रावी ग्रंथी विविध संप्रेरकं निर्माण करतात आणि ती रक्ताद्वारे शरीरातील विविध अवयवांपर्यंत पोहोचवतात. या ग्रंथींच्या आणि संप्रेरकांच्या कार्यावर आपल्या शरीरातील चयापचय, प्रजनन, वाढ, मानसिक स्वास्थ्यादी गोष्टी अवलंबून असतात. महिलांच्या आयुष्यातील स्थित्यंतरांच्या काळात अंत:स्त्रावी ग्रंथींच्या आणि पर्यायानं संप्रेरकांच्या कार्यप्रणालीतही आमूलाग्र बदल होतं असतात. संप्रेरकांच्या पातळीवर होणारे हे बदल सूक्ष्म आणि बरेचदा मानसिक स्तरावर होतात. त्यामुळे त्यांचे परिणाम दूरगामी असतात. म्हणूनच या स्थित्यंतराच्या काळात विशेषतः ऋतुप्राप्ती आणि ऋतुनिवृत्ती होत असताना मन हळवं, कातर, अस्थिर आणि अस्वस्थ होतं. काहींच्या बाबतीत ही मनाची दुर्बलता तात्पुरती असते पण काहींच्या बाबतीत मात्र यांचे परिणाम दूरगामी ठरतात. बरं ही स्थित्यंतरं घडून येत असताना स्त्रियांना विश्रांती मिळतेच असं नाही. कारण घरातील अनेक जबाबदाऱ्या स्त्रियांना सांभाळायच्या असतात. नोकरी असेल तर तारेवरची कसरत बघायला नको. अगदी स्थित्यंतराच्या काळातही या जबाबदाऱ्यांपासून स्त्रियांची मुक्तता होत नाही. या काळात संप्रेरकांमुळे घडून येणारे मुख्य शारीरिक बदल म्हणजे वजन वाढणं, शरीराची जाडी वाढणं, तरीही थकवा जाणवणं. तर मानसिक बदल म्हणजे मनावर ताण जाणवणं, मनाची अस्थिरता, भीती, न्यूनगंड, मनाचा गोंधळ, निर्णय घेण्याची क्षमता कमी होणे, आत्मविश्वास डळमळणं. या मानसिक ताणतणावांचा परिणाम आपल्या शरीरातील विविध संस्थांच्या कार्यावर देखील होतो.
अक्ष – सिद्धांत : यासंदर्भात योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे आणि डॉ. उल्का नातू यांनी डएचक्झज अक्षाचा सिद्धांत सांगितला आहे. हा सिद्धांत थोडक्यात पुढीलप्रमाणे – जीसरप असे या अक्षावरील एकमेकांशी जोडलेले बिंदू आहेत. जेव्हा विचारांना अध्यात्मिकतेची बैठक असते तेव्हा भावना नियंत्रित राहतात. भावनांचं नियंत्रण जमलं की मन स्थिर होतं आणि मानसिक स्वास्थ्य चांगलं राहतं. यासाठी कारणीभूत असणाऱ्या शारीरिक स्तरावरच्या संस्था म्हणजे हायपोथॅलॅमस, पिच्युटरी ग्रंथी आणि शरीरातील इतर अवयव. हायपोथॅलॅमस हा मेंदूतील अगदी लहानसा भाग असून शरीरातील सर्व महत्त्वाची संप्रेरकं प्रामुख्यानं हायपोथॅलॅमसकडून पाठवली जातात. त्यामुळे सर्वात महत्त्वाची शरीरातील कार्यं हायपोथॅलॅमसवर अवलंबून असतात. हायपोथॅलॅमसनं पाठवलेली संप्रेरकं प्रथम पिच्युटरीग्रंथीकडे पाठवली जातात व तेथून ती आवश्यक त्या इतर अवयवांकडे पोहोचवली जातात. भावना जेव्हा अति उत्तेजित होतात, त्यावर नियंत्रण राहत नाही तेव्हा हायपोथॅलॅमसकडून अधिक प्रमाणात संप्रेरकांचा स्राव केला जातो. त्याचा परिणाम पर्यायानं अंत:स्त्रावी ग्रंथांच्या कार्यावर होतो. व त्यानंतर इतर अवयवांवर होतो. आपल्या लक्षात आलंच असेल की, आपल्यामध्ये दिसणाऱ्या कितीतरी शारीरिक रोगांचं कारण भावनिक आणि मानसिक असंतुलन आहे.



योग एक अपूर्व देणगी : अशा परिस्थितीत योग म्हणजे स्त्रियांसाठी दैवी देणगी आहे. त्यांच्यासाठी योग म्हणजे जणू वाळवंटातील मरुद्यान, शांतता देणारी जणू हिरवळ. आत्तापर्यंतच्या लेखांमध्ये आपण योगसाधनेचे सकारात्मक शारीरिक आणि मानसिक परिणाम पाहिले आहेतच. नित्यजीवनात तसेच स्थित्यंतराच्या काळात जर नियमित आणि उचित योगसाधना केली, तर आसन प्राणायामादी क्रियांनी शारीरिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. त्याचबरोबर मनही स्थिर, खंबीर ठेवता येतं. आत्मविश्वास डळमळत नाही. मुख्य म्हणजे वयोमानानुसार होणाऱ्या विविध बदलांना सामोरं जायचं सामर्थ्य प्राप्त होतं तसेच हे बदल समजण्याची आणि आनंदानं स्वीकारण्याचीही शक्ती मिळते. योगसाधनेतील धारणा, ध्यान इत्यादींमुळे स्वतःला समजण्याचं, आपल्यामधील सुप्त शक्ती ओळखण्याचं आणि त्या जागृत करण्याचं सामर्थ्य निर्माण होतं. नित्यनेमानं केलेली उचित योगसाधना उत्साह, जोम, चैतन्य, आनंद, सकारात्मकता आपल्यामध्ये निर्माण करतेच पण आपल्या सहवासातील आपली मुलं, भावंडं, आपले सहकारी, मैत्रिणी, घरातील ज्येष्ठ नागरिक यांच्यातही निर्माण करते.
स्त्री हा घरातील केंद्रबिंदू असतो. घरातील सर्व सदस्यांचे धागे घरातील कर्त्या, धर्त्या स्त्रीशी जोडलेले असतात. घरातील स्त्री शिकली, तर सगळं घर साक्षर होतं असं म्हणतात त्याप्रमाणेच घरातील स्त्री आनंदी, शरीरानं स्वस्थ आणि मनानं खंबीर परंतु समजूतदार असेल, तर सगळं घरच आनंदी होतं.
आपल्या परंपरेत इतकच नव्हे तर तत्त्वज्ञानातही स्त्रीला शक्ती म्हणजेच ऊर्जेचा स्त्रोत मानलं आहे. विश्वाची निर्मिती करायची तर ईश्वराला शक्तीची म्हणजेच ऊर्जेची आवश्यकता असते असं आपली संस्कृती मानते. जे वैश्विक स्तरावर तेच कौटुंबिक स्तरावरही तितकंच सत्य आहे. म्हणूनच स्त्रीनं स्वतःतील शक्तीला ओळखणं आवश्यक आहे आणि त्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे ती निरंतर योगसाधना. योग आपल्या आनंदाचं निदान आणि आनंदाची पर्वणी आहे.

***

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? – डॉक्टर टीप्स



दलिया–सकाळचा नाश्ता हा संपुर्ण दिवसभरातुन महत्वाचा आहार असतो. आणि तरीही आपल्यातले बरेचजण या गोष्टीकडे कानाडोळा करतात. जेव्हा तुम्ही नाश्ता करत नाही तेव्हा एक प्रकारे तुम्ही तुमच्या चेहेऱ्याला स्वस्थ ठेवण्याची एक चांगली संधी गमावता. दलीया डोनट्स्, बगेल्स, आणि जेलीपेक्षा बरेच जास्त गुणधर्म दलीयात आहे. ब्रेकफास्ट न केल्याने तुमच्या खाण्यात जी कमतरता राहाते त्यामुळे तुमच्या त्वचेवर विपरीत परीणात होवु शकतो. म्हणुन जर तुम्ही तुमच्या त्वचेला स्वस्थ आणि एकसारखी ठेवु ईच्छिता तर सकाळी सकाळी नाश्त्याच्या वेळी दलीयाचे सेवन अवश्य करा.

**(क्रमश. )**



## विनोद




**मुन्ना : तुला जपानी बोलता येते?**
**पप्पू : हो.**
**मुन्ना : बोल बरं.**
**पप्पू : जपानी.**

## संदेश

Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka highlights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## सुविचार

जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल.

**– स्पॅनिश म्हण**



**संस्कृत सुभाषित**
**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**
**(शांतीपर्व, अध्याय १०३, ।क ९, महाभारत)**

**अर्थ** –शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**
१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

**उभे शब्द**
१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची–उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवाहवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

**आडवे उत्तर**
१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

**उभे उत्तर**
१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### कर्णधार बनताच पृथ्वीने मॅच फिरवली, वादळी खेळीने जिंकला

मुंबई-टीम इंडियाचा स्टार खेळाडू पृथ्वी शॉ गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय संघात जागा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. पण अद्यापही त्याला भारतीय संघात जागा मिळाली नाही आहे.त्यामुळे तो देशांतर्गत सामन्यात खेळतो आहे. या सामन्यातील एका स्पर्धेत त्याच्यावर कर्णधार पदाची जबाबदारी देण्यात आली होती. ही जबाबदारी मिळताच त्याने एका सामन्यात वादळी खेळी करून मॅच फिरवली आहे. त्याच्या या खेळीने महाराष्ट्राने सामना जिंकला आहे. सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी ही स्पर्धा खेळवली जात आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र या संघाची जबाबदारी पृथ्वी शॉच्या खांद्यावर देण्यात आली आहे. ही जबाबदारी मिळताच पृथ्वी शॉने ६६ धावांची वादळी खेळी करून सामन्याचा निकाल बदलला आहे.
खरं तर हैदराबादने महाराष्ट्रसमोर १९२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना महाराष्ट्राकडून कर्णधार पृथ्वी शॉ आणि अर्शिन कुलकर्णी सलामीसाठी मैदानात उतरले होते. या दोघांनी पहिल्या बॉलपासून प्रहार करायला सूरूवात केली होती.यावेळी पृथ्वी शॉने ३६ बॉलमध्ये ६६ धावांची खेळी केली होती. या खेळीत त्याने ३ षटकार आणि ९ चौकार मारले होते.

### स्मृती-पलाशच्या लग्नात आणखी एक ट्विस्ट, मैत्रिणीने फोडला बॉम्ब!

मुंबई-भारतीय क्रिकेटपटू स्मृती मंधाना आणि संगीतकार पलाश मुच्छल यांचे २३ नोव्हेंबरला होणारे लग्न अचानक पुढे ढकलले गेले आणि त्यानंतर या सेलिब्रिटी कपलच्या नात्यात खूप मोठे वादळ सुरू झाले. स्मृतीचे वडील आजारी असल्याने लग्न पुढे ढकलल्याचे कारण देण्यात आले असले तरी, सोशल मीडियावर सुरू झालेल्या अफवा आणि आरोपांच्या भूकंपाने संपूर्ण वातावरण तापले आहे.
लग्नाची तारीख पुढे ढकलल्यापासून सोशल मीडियावर पलाशवर एकापाठोपाठ एक आरोप केले जात आहेत.
सुरुवातीच्या आरोपांमध्ये पलाश दुसऱ्या महिलेशी बोलत असल्याच्या काही चॅट्सचे स्क्रीनशॉट्स व्हायरल झाले.
या स्क्रीनशॉट्सच्या आधारावर लोकांनी पलाशवर स्मृतीची फसवणूक करत असल्याचा आरोप केला.
यानंतर हे प्रकरण इतके वाढले की, लग्नाच्या डान्स परफॉर्मन्ससाठी टीममध्ये असलेली कोरिओग्राफर नंदिका द्विवेदीचे नाव या वादाशी जोडले जाऊ लागले. पलाश आणि नंदिका यांच्यात जवळीक वाढल्याचा आणि स्मृतीला याची कल्पना नसल्याचा दावा अनेक सोशल मीडिया युजर्सनी केला.

### अवघ्या ३२ धावा करताच विराट इतिहास घडवणार!

दिल्ली-भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका पार पडली. ही मालिका झाल्यानंतर आता दोन्ही संघ वनडे सामन्यांची मालिका खेळण्यासाठी आमनेसामने येणार आहेत. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका रंगणार आहे. क्रिकेट चाहते ही मालिका सुरू होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत, कारण विराट कोहली आणि रोहित शर्मा या मालिकेतून पुनरागमन करताना दिसून येणार आहेत. मालिकेतील पहिला कसोटी सामना रविवारी रांचीत खेळवला जाणार आहे. दरम्यान मालिकेतील पहिल्याच सामन्यात विराट कोहलीकडे दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज जॅक कॅलिसचा मोठा विक्रम म ोडून काढण्याची संधी असणार आहे.मालिकेतील पहिल्याच सामन्यात अवघ्या ३२ धावा करताच विराट कोहली वनडे क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्ध १५३६ धावा पूर्ण करणार आहे. यासह तो जॅक कॅलिसलाम मागे टाकून भारत-दक्षिण आफ्रिका वनडे मालिकेत सर्वाधिक धावा करणारा दुसराच फलंदाज ठरू शकतो. सध्या तो या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. पण पहिल्याच सामन्यात ३२ धावा करून तो या यादीत दुसऱ्या स्थानी झेप घेऊ शकतो.

# डेफलिंपिक २०२५ मध्ये भारताने जिंकली २० पदके

## डेफलिंपिक २०२५ मध्ये भारताने नऊ सुवर्ण पदकांवर कोरले नाव



**टोकियो :** जपानमधील टोकियो येथे १५ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या उन्हाळी डेफलिंपिक २०२५ मध्ये भारताने वीस पदके जिंकली. यात नऊ सुवर्ण (गोल्ड), सात रौप्य (सिल्व्हर) आणि चार कांस्य (ब्राँझ) पदकांचा समावेश आहे. भारताने जिंकलेल्या वीस पदकांपैकी सोळा पदके नेमबाजांनीच जिंकली आहेत. डेफलिंपिकमधील ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. याआधी २०२२ च्या डेफलिंपिकमध्ये भारताने आठ सुवर्ण, एक रौप्य आणि सात कांस्य अशी सोळा पदके जिंकली होती.
यंदा २५ वे डेफलिंपिक झाले, पहिले डेफलिंपिक १९२४ मध्ये पॅरिस येथे झाले होते. या स्पर्धेला १०१ वर्षांची परंपरा आहे. यंदाच्या डेफलिंपिकमध्ये भारताने ११ स्पर्धेत भाग घेतला होता. यासाठी भारतातून ७३ खेळाडूंचा चमू टोकियो येथे आला होता. यात ४५ पुरुष आणि २८ महिला खेळाडू होते.
टोकियो २०२५ मध्ये, ऑलिंपियन दीक्षा डागरने महिला गोल्फ स्पर्धेत तिचे डेफलिंपिक विजेतेपद राखले. नेमबाजीमध्ये १२ खेळाडूंसह सर्वात मोठा भारतीय संघ होता तर ॲथलेटिक्समध्ये भारताकडून ११ खेळाडू सहभागी झाले होते.
धनुष श्रीकांतने १० मीटर एअर रायफल प्रकारात २५२.२ गुणांसह विश्वविक्रम केला. मोहम्मद वानियाने त्याच स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. या स्पर्धेत नेमबाजांनी भारताला पहिले पदक जिंकून दिले. महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत महित संधू आणि कोमल वाघमारे यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक जिंकले.रायफल एस महित संधू हा सर्वात यशस्वी नेमबाज होता ज्याने दोन सुवर्ण आणि दोन रौप्य पदकांसह चार पदके जिंकली. अनुया प्रसादने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत विश्वविक्रम केला. अभिनव देशवालने पुरुषांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आणि पात्रता फेरीत जागतिक आणि डेफलिम्पिक विक्रमाशी बरोबरी केली. प्रांजली धुमाळने महिलांच्या २५ मीटर पिस्तूलमध्येही असेच केले. लोमा स्वेनने कराटेमध्ये भारतासाठी पहिल्यांदाच डेफलिंपिक पदक जिंकले.

२०२५ च्या डेफलिंपिकमध्ये भारतीय पदक विजेते खेळाडू - कार्यक्रम - खेळ - पदक
दीक्षा डागर - महिला वैयक्तिक - गोल्फ - सुवर्ण
धनुष श्रीकांत/महित संधू - मिश्र १० मीटर एअर रायफल संघ - शूटिंग - सुवर्ण
धनुष श्रीकांत - पुरुषांची १० मीटर एअर रायफल - शूटिंग - सुवर्ण
अनुया प्रसाद - महिलांची १० मीटर एअर पिस्तूल - शूटिंग - सुवर्ण
अभिनव देशवाल/प्रांजली धुमाळ - मिश्र १० मीटर एअर पिस्तूल - शूटिंग - सुवर्ण
महित संधू - महिला ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स - शूटिंग - सुवर्ण
अभिनव देशवाल - पुरुषांची २५ मीटर पिस्तूल - शूटिंग - सुवर्ण
प्रांजली धुमाळ - महिलांची २५ मीटर पोस्टोल - शूटिंग - सुवर्ण
सुमित दहिया - पुरुष ९७ किलो - कुस्ती - सुवर्ण
मोहम्मद वानिया - पुरुषांची १० मीटर एअर रायफल - शूटिंग - रौप्य
महित संधू - महिलांची १० मीटर एअर रायफल - शूटिंग - रौप्य
अभिनव देशवाल - पुरुषांची १० मीटर एअर पिस्तूल - शूटिंग - रौप्य
प्रांजली धुमाळ - महिलांची १० मीटर एअर पिस्तूल - शूटिंग - रौप्य
महित संधू - महिलांची ५० मीटर रायफल प्रोन - शूटिंग - रौप्य
शौर्य सैनी - पुरुषांची ५० मीटर रायफल प्रोन - शूटिंग - रौप्य
अमित कृष्णन - पुरुष ८६ किलो - कुस्ती-रौप्य
लोमा स्वेन - कुमिते ५० किलो - कराटे - कांस्य कोमल वाघमारे - महिलांची १० मीटर एअर रायफल - शूटिंग - कांस्य
कुशाग्र सिंग राजावत - पुरुषांची ५० मीटर रायफल प्रोन - शूटिंग - कांस्य
मोहम्मद वानिया/कोमल वाघमारे - मिश्र १० मीटर एअर रायफल संघ - शूटिंग - कांस्य

## धोनीच्या घरी टीम इंडियाची पार्टी; पण गौतम गंभीरची गैरहजेरी



रांची : दक्षिण आफ्रिके विरुद्ध टेस्ट सीरिजमध्ये झालेल्या २-० अशा पराभवानंतर भारतीय संघ आता वनडे सामन्यांसाठी रांचीमध्ये दाखल झाला आहे. रांचीत ३० नोव्हेंबरला होणाऱ्या पहिल्या वनडेपूर्वी टीम इंडिया हॉटेलवर पोहोचली असली, तरी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर मात्र अद्याप आलेला नाही. गंभीर अनुपस्थित असतानाच भारतीय खेळाडू माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीच्या फार्महाऊसला भेट देण्यासाठी गेले.रांचीमध्ये धोनीच्या फार्महाऊसवर भारतीय खेळाडूंसाठी खास पार्टीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसह बहुतेक वरिष्ठ खेळाडूंनी धोनीची भेट घेतली असून टीमचा कोच गंभीर मात्र या वेळी गैरहजर होता. धोनी आणि गंभीर यांच्यातील जुन्या वाद-ाची चर्चा पुन्हा एकदा रंगताना दिसत आहे. याआधी २०११ च्या विश्वविजयानंतर गंभीरने अनेकदा अप्रत्यक्षपणे केलेल्या टीकेमुळे दोघांमध्ये मतभेद असल्याची चर्चा वारंवार झाली. 'वर्ल्ड कप केवळ एका सिक्समुळे नव्हे, तर संपूर्ण संघाच्या कामगिरीमुळे जिंकला' असे गंभीरचे मत त्या काळात चर्चेत आले होते.दरम्यान, दक्षिण आफ्रिकेविरुद्धची टेस्ट सीरिज हरल्यानंतर गंभीरवर चाहत्यांचा रोष वाढला आहे. गुवाहाटीतील पराभवानंतर स्टेडियममध्ये गंभीरविरोधात घोषणा देण्यात आल्या आणि त्याला पदावरून दूर करावे, अशी मागणीही झाली. या प्रतिक्रियांबाबत विचारले असता, आपल्या पदाबाबतचा निर्णय बीसीसीआय घेईल, मी टीमपेक्षा मोठा नाही, असे



यूकेतील लंडन येथे झालेल्या यूईएफए चॅम्पियन्स लीग फुटबॉल सामन्यात स्पर्धा करताना आर्सेनल आणि बायर्न म्युनिक खेळाडू.

# २०२५आशिया कपसाठी भारतीय संघाची घोषणा

मुंबई-आशिया कपसाठी पुन्हा एकदा रंगमंच तयार झाला आहे. वेळापत्रक आधीच जाहीर झालं होतं आणि चाहते टीम इंडियाची घोषणा होण्याची वाट पाहत होते. आता संघ जाहीर झाला आहे. महत्त्वाचं म्हणजे, वैभव सूर्यवंशीला संघाचा कर्णधार म्हणून निवडण्यात आलेलं नाही. त्यांचा फलंदाज म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे. हा अंडर-१९ आशिया कप असला तरी, भारत आणि पाकिस्तानचे युवा संघ पुन्हा एकदा एकमेकांसमोर येतील.
१९ वर्षांखालील आशिया कपसाठी आयुष म्हात्रेची कर्णधार म्हणून नियुक्ती : १९ वर्षांखालील आशिया कपसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. बीसीसीआयच्या ज्युनियर क्रिकेट समितीनं संघ जाहीर केला आहे. ही स्पर्धा १२ डिसेंबरपासून दुबईमध्ये खेळवली जाईल. युवा फलंदाज आयुष म्हात्रेला संघाचं कर्णधारपद देण्यात आलं आहे, तर विहान मल्होत्राला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. वैभव सूर्यवंशीचाही संघात समावेश करण्यात आला आहे. तो सलामीवीर फलंदाज म्हणून दिसणार आहे. आयुष म्हात्रे सध्या १८ वर्षांपेक्षा जास्त आणि १९ वर्षांपेक्षा कमी वयाचा आहे, म्हणूनच त्याला कर्णधारपद देण्यात आलं आहे असं मानलं जात आहे. वैभव सूर्यवंशी सध्या सुमारे १४ वर्षांचा आहे.
भारत आणि पाकिस्तान एकाच गटात : भारत आणि पाकिस्तानला आशिया कपसाठी एकाच गटात स्थान देण्यात आलं आहे. या दोघांसह इतर दोन संघ अद्याप जाहीर झालेले नाहीत. दुसऱ्या गटाबाबत, बांगलादेश, श्रीलंका आणि अफगाणिस्तानसह चौथा संघ अद्याप जाहीर झालेला नाही. १२ डिसेंबर रोजी १९ वर्षांखालील आशिया कपमध्ये टीम इंडियाचा प्रवास सुरु होईल. त्या तारखेला भारताविरुद्धचा सामना अद्याप निश्चित झालेला नाही. त्यानंतर १४ डिसेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान एकमेकांसमोर येतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यात एक सामना निश्चित झाला आहे, परंतु जर संघ त्यापुढं गेले तर तिथंही संघर्ष होण्याची शक्यता आहे. वैभव सूर्यवंशी पुन्हा एकदा आशिया कपमध्ये लक्ष केंद्रित करेल.
आशिया कपसाठी भारतीय संघ : आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू, हरवंश सिंग, युवराज गोहिल, कनिष्क चौहान, खिलन ए. पटेल, नमन पुष्पक, डी. दीपेश, हेनिल पटेल, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन, एरॉन जॉर्ज
स्टँडबाय खेळाडू : राहुल कुमार, हेमचूदेशन जे, बीके किशोर, आदित्य रावत.



# भारतीय संघ श्रीलंकेविरुद्ध टी-२० मालिका खेळणार

मुंबई-२०२५ चं आयसीसी महिला वनडे विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघानं अद्याप एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. टीम इंडिया बांगलादेशविरुद्ध घरच्या मैदानावर मालिका खेळणार होती, परंतु खेळाडूंना अधिक विश्रांती देण्यासाठी बीसीसीआयनं ती पुढं ढकलण्याचा निर्णय घेतला. बीसीसीआयनं आता भारतीय महिला संघाचं पुढील आंतरराष्ट्रीय वेळापत्रक जाहीर केलं आहे, ज्यामध्ये श्रीलंकेच्या महिला संघाविरुद्ध घरच्या मैदानावर पाच सामन्यांची टी-२० मालिका असेल. ही मालिका २१ डिसेंबरपासून सुरु होईल आणि अंतिम सामना ३० डिसेंबरला होणार आहे.टी-२० विश्वचषकाच्या तयारीवर लक्ष केंद्रित : आयसीसी महिला टी-२० विश्वचषक जून २०२६ मध्ये इंग्लंडमध्ये खेळला जाईल आणि त्यासाठी भारतीय महिला संघाकडे तयारीसाठी जास्त वेळ शिल्लक नाही. त्यामुळं, या मेगा इव्हेंटच्या तयारीसाठी टीम इंडियासाठी ही मालिका महत्त्वाची ठरेल. भारतीय महिला संघ या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना २१ डिसेंबर रोजी विशाखापट्टणमच्या मैदानावर खेळणार आहे, तर दुसरा सामना २३ डिसेंबर रोजी त्याच मैदानावर खेळला जाईल. शेवटचे तीन टी-२० सामने २६, २८ आणि ३० डिसेंबर रोजी तिरुवनंतपुरम स्टेडियमवर खेळले जातील. या टी-२० मालिकेत सर्वांचं लक्ष टीम इंडियाची कर्णधार हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना आणि जेमिमा रॉड्रिग्जवर असेल, ज्यांनी वनडे विश्वचषकात प्रभावी फलंदाजी केली होती.
टीम इंडियाचा श्रीलंकेविरुद्ध आतापर्यंतचा दबदबा : टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये श्रीलंकेच्या महिला संघाविरुद्ध भारतीय संघाचा दबदबा स्पष्टपणे दिसून आला आहे. टीम इंडियानं श्रीलंकेविरुद्ध एकूण २६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, त्यापैकी २० जिंकले आहेत.

# हे चुकीचे आहे.., गंभीरवर टीका करणाऱ्यांवर सुनील गावसकर भडकले

मुंबई,-भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये झालेल्या कसोटी मालिकेत भारतीय संघाला २-० ने पराभवाचा सामना करावा लागला आहे. याआधी न्यूझीलंडविरूद्ध झालेल्या कसोटी मालिकेतही भारतीय संघाला ३-०ने पराभवाचा सामना करावा लागला होत. भारतीय संघाला भारतात खेळताना ३ वेळा व्हॉईटवॉशचा सामना करावा लागला आहे. त्यापैकी २ वेळा गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना झाला आहे. त्यामुळे गौतम गंभीरवर जोरदार टीका केली जात आहे. अनेकांनी त्याला मुख्य प्रशिक्षकपदावरून काढून टाकण्याची मागणी केली आहे. दरम्यान जोरदार टीका होत असताना सुनील गावसकर हे गौतम गंभीरच्या पाठीशी उभे राहिले आहेत. इंडिया टूडेवर बोलताना सुनील गावसकर गौतम गंभीरचा बचाव करताना दिसून आले आहेत. सुनील गावसकर म्हणाले, मफ्तो (गौतम गंभीर) मुख्य प्रशिक्षक आहे. खेळाडूंना तयार करणं हे त्याचं काम आहे. मग खेळाडूंनी मैदानावर जाऊन चांगली कामगिरी करायला हवी. जेव्हा भारताने आशिया कप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली, तेव्हा लोकांनी गंभीरचं कौतुक केलं नव्हतं.

# अभिषेक शर्माला दोनदा बाद केले, सुपर ओव्हरमध्ये हरियाणाचा पंजाबवर रोमांचक विजय



हैदराबाद-चेन्नई सुपर किंग्जचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज यानं सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत हरियाणाकडून खेळताना भारताचा सलामीवीर अभिषेक शर्माला दोनवेळा बाद केलं. हरियाणा आणि पंजाब यांच्यातील सामन्याचा निकाल सुपर ओव्हरमध्ये लागला. यात हरियाणानं बाजी मारली. हरियाणानं पहिल्यांदा फलंदाजी करताना ९ बाद २०७ धावा केल्या होत्या. पंजाबचा संघ देखील ७ बाद २०७ धावा करु शकला. यामुळे मॅचचा निकाल सुपर ओव्हरमध्ये लागला, यामध्ये हरियाणाने बाजी मारली. हरियाणाच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी केली. यामध्ये कॅप्टन अंकित कुमारने २६ बॉलमध्ये ५१ धावा केल्या. तर, निशांत सिंधू यानं ३२ बॉलमध्ये ६१ धावा केल्या. १३ ओव्हर संपण्यापूर्वीच हरियाणानं १४० धावांचा टप्पा पार केला होता. सुमित कुमारनं १४ बॉलमध्ये २८ धावांची खेळी केली. त्यामुळे हरियाणाने २० ओव्हरमध्ये ९ बाद २०७ धावा केल्या. पंजाबकडून अश्विनी कुमारने ३१ धावा देत तीन विकेट घेतल्या.
अंशुल कंबोज याने पंजाबच्या संघाला सुरुवातीला दोन धक्के दिले. अभिषेक शर्माला ६ धावा आणि प्रभासिमरन सिंह याला २० धावांवर बाद केलं.

### अंशुल कंबोजने करुन दाखवले



पंजाबनं २८ धावांवर दोन विकेट गमावल्या होत्या. यानंतर अनमोलप्रीत सिंह यानं ३७ बॉलमध्ये ८१ धावांची आक्रमक खेळी करत पंजाबला मॅचमध्ये परत आणलं. अनमोलप्रीत सिंहनं सलील अरोरा सोबत ६८ धावांची भागीदारी केली. सलील अरोरा २२ धावा करुन बाद झाला. यानंतर सनवीर यानं ३० धावा, रमनदीपनं १३ धावा, हरप्रीत ब्रारनं १० धावा केल्यानं पंजाबच्या संघानं २० ओव्हरमध्ये ७ बाद २०७ धावा केल्या. हरियाणाकडून अंशुल कंबोजनं २६ धावांवर २ विकेट, जाखडनं ३७ धावा २ विकेट, युजवेंद्र चहलनं ४० धावा देत दोन विकेट काढल्या.
सुपर ओव्हरमध्ये पंजाबचा संघ पहिल्यांदा फलंदाजीला आला. अंशुल कंबोजनं पहिल्या तीन बॉलमध्येच अभिषेक शर्मा आणि सनवीर सिंह यांना बाद केलं. हरियाणाला विजयासाठी दोन धावा करायच्या होत्या, निशांत सिंधून चौकार मारत हरियाणाला विजय मिळवून दिला. पुदूचेरीकडून बडोद्याचा पराभव-पुदूचेरीनं सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत बडोद्याचा १७ धावांनी पराभव केला. अमन खानच्या ७२ धावांच्या जोरावर पुदूचेरीनं ९ बाद १६६ धावा केल्या होत्या. बडोद्याच्या राज लिंबानीनं ३५ धावा देत ३ विकेट घेतल्या.बडोद्याकडून शिवालिक शर्मानं ५६ धावा केल्या. मात्र, आदिल टुंडानं ४ विकेट घेतल्यानं बडोद्याचा संघ १८.५ ओव्हरमध्ये १४९ धावा करु शकला.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी** :लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी शाळेच्या प्रभारी प्राचार्या नम्रता झांबरे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, विद्या पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

२६ नोव्हेंबर हा दिवस भारताच्या लोकशाही इतिहासात अतिशय खास मानला जातो. या दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. भारतात दरवर्षी आजचा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. संविधानातील प्रत्येक शब्दाचा अर्थ मुलांना शाळेचे समन्वयक रौफ शेख यांनी समजाऊन सांगीतला. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित असलेले श्रीकृष्ण लाटे, शाळेतील शिक्षक, शिक्षीका यांनी संविधान दिवसाच्या विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसीचे अन्वेषण संशोधन महोत्सवमध्ये दैदिप्यमान यश



**लातूर/प्रतिनिधी** :अन्वेषण संशोधन महोत्सवमध्ये चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा गौरव वाढवला आहे. संशोधनाधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या महाविद्यालयाच्या उपक्रमांना या निकालांनी मोठा प्रतिसाद मिळाला असून विद्यार्थ्यांची नाविन्यपूर्ण विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नेतृत्वक्षम कौशल्ये यांचे उत्तम प्रदर्शन या स्पर्धेत पाहायला मिळाले. अभियांत्रिकी विभागामध्ये स्वप्नील कांबळे, वैष्णवी हेसे आणि वैष्णवी मलवाड यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सादर केलेल्या अभिनव संशोधन प्रकल्पामुळे प्रथम क्रमांक पटकावला. इंटरडिसिप्लिनरी विभागात अंकिता बर्दापूरे, श्रेया पवार आणि वैष्णवी कारभारी यांनी विविध शैक्षणिक शाखांचा समन्वय साधत केलेल्या बहुआयामी संशोधनाद्वारे तृतीय क्रमांक मिळवला. संशोधन विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश भुसनुरे यांनी या कामगिरीचे कौतुक करत सांगितले की, विद्यार्थ्यांनी केलेली ही विद्यापीठस्तरीय कामगिरी महाविद्यालयाच्या संशोधन परंपरेला बळकटी देणारी ठरेल आणि आगामी काळात आणखी विद्यार्थी संशोधन क्षेत्रात मोठी पावले टाकतील. सदरील यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवनीकर, विश्वस्थ श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुणप्पा हालकुडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवप्पा नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. बालाजी अजगुंडे, प्रा. स्नेहल जोगदंड, प्रा. दिक्षा विभुते, प्रा. श्रद्धा सुरवसे, प्रा. अनामिका पटणे, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चांगले स्वास्थ्य हीच खरी ताकद – अभिनेता अक्षय कुमार

**पुणे/प्रतिनिधी** : 'लहान मुले हल्ली मोबाइल गेममध्ये रमली असून मैदानात येणाऱ्या मुलांची संख्या सध्या कमी झालेली पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत पुण्यातून ४४ हजार खेळाडू मैदानात उतरतात, ही खूपच मोठी गोष्ट आहे. खेळातूच उत्तम आरोग्य घडत असते आणि आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे आणि चांगले स्वास्थ हीच खरी ताकद असल्याचे मत अभिनेता अक्षय कुमारने व्यक्त केले.पुण्याचे खासदार आणि केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारानं आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाचा गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप झाला.

# रेणापूर येथे संत सेवालाल महाराजांचे भव्य दिव्य भवन बांधून देणार

## रेणापूर शहराच्या विकासासाठी भाजपाने कोट्यावधीचा निधी दिला: आ. रमेशआप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर शहरासह कार्यक्षेत्रातील वाडी तांड्याच्या विकासासाठी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून गेल्या पाच – सात वर्षात विविध विकास कामासाठी ७० ते ८० कोटी रुपयाचा निधी मंजूर करून आणला येत्या मार्चपर्यंत आणखी २५ कोटी रुपयांचा विकास निधी आणणार असून बंजारा समाज बांधवांनसाठी संत सेवालाल महाराज यांचे भव्य दिव्य भवन लवकरच बांधणार असल्याचे सांगून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पंधरा वर्षातील काँग्रेसच्या आमदारांनी रेणापूरच्या विकासासाठी कोणती कामे केली, किती निधी दिला याचा हिशोब काँग्रेसवाल्यांनी जनतेला द्यावा असे आव्हान केले.





रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव आकनगिरे आणि १३, १४, १५, १६ या प्रभागातील भाजपाचे उमेदवार उत्तम चव्हाण, ज्योती विजय चव्हाण, चतुरा साहेबराव लोकरे, अंजना दिलीप चव्हाण यांच्या प्रचारार्थ रेणुका नगर रूपचंद नगर परिसरात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांची जाहीर सभा झाली. या सभेस भाजपाचे लातूर ग्रामीणचे माजी आमदार ॲड त्र्यंबकनाना भिसे, भाजयुमोचे जिल्हा अध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, श्रीनिवास आकनगिरे, महेंद्र गोडभरले, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, शरद दरेकर, शहराध्यक्ष अच्युत कातळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या सभेला बंजारा समाज बांधवासह चारही प्रभागातील मतदार बंधू भगिनींची मोठी गर्दी होती.

रेणापूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत भाजपाचा नगराध्यक्ष होण्याचा मान मतदाराच्या आशीर्वादाने मिळाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नगरपंचायतीवर भाजपाची सत्ता आल्याने केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून प्रशासकीय इमारत, अशोक सम्राट बौद्ध विहार, रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, नवीन पाणीपुरवठा योजना, ईदगाह मैदान संरक्षण भिंत, अंगणवाडी सुसज्ज इमारती, इंन्डोअर स्टेडियम, विविध समाजासाठी समाज मंदिरे, रस्ते, नाली बांधकाम यासह विविध कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणला यातील अनेक कामे झाली आहेत काही कामे प्रगतीपथावर आहेत तर इतर कामे येत्या काळात होणार आहेत. घरकुल व इतर वैयक्तिक लाभाच्या योजनेचा गरजू आणि गरीब कुटुंबांना देण्यात आला रेणापूर प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. येणाऱ्या वर्षभरात रेणापूर शहराच्या विकासाचे कुठलेही काम शिल्लक राहणार नाही याचे नियोजन करण्यात आले असून काँग्रेसने आजपर्यंत केवळ भुलथापा आणि खोटी आश्वासने देऊन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस आमदारांनी रेणापूर शहरात कुठल्या विकासाला निधी आणला कोणती कामे केली असा प्रश्न उपस्थित करून केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे रेणापूरच्या विकासाची नगर पंचायतीतही भाजपाची सत्ता आवश्यक असून भाजपाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. यावेळी बोलताना माजी आमदार त्र्यंबक नाना भिसे म्हणाले की, काँग्रेसकडे विकासाची दृष्टी असलेले नेतृत्व राहिले नाही. विलासराव देशमुख विकासाभिमुख नेतृत्व होते त्याच पद्धतीने देवेंद्रजी राज्यात काम करत आहेत. भाजपाच्या माध्यमातून संपूर्ण देशभर आणि राज्यात विकासाची गती वाढली असून रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदारसंघात अतिशय चांगली विकासाची कामे होत आहेत रेणापूर शहराच्या विकासासाठी सत्तेचे बळ असणारे भाजपाचे नेतृत्वच काम करू शकते तेव्हा मतदारांनी गावच्या हितासाठी प्रगतीसाठी भाजपाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

विधानसभा निवडणुकीनंतर नगरपंचायतीची निवडणूक होत असल्याचे सांगून युवा नेते ऋषिकेश दादा कराड म्हणाले की, रेणापूर शहरासह बंजारा वस्तीतील प्रत्येकाच्या मनामनात केवळ कमळ आहे. कुणी कितीही भुल थापा देऊन मन वळविण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा उपयोग होणार नाही मतदार विकासाच्या बाजूने आहे भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी रमेशआप्पा हेच उमेदवार आहेत असे समजून सर्व उमेदवार विक्रमी मताने विजयी होण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

या सभेत अभिषेक आकनगिरे यांनी गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विविध विकास कामाची माहिती दिली, श्रीनिवास आकनगिरे, उमेदवार ज्योती चव्हाण, उत्तम चव्हाण, दिलीप चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करून मतदारांची सेवा करण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत असे बोलून दाखविले. प्रारंभी विजय चव्हाण यांनी सभेचे प्रास्ताविक केले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या सभेस दिनकर राठोड, गणेश चव्हाण, उज्वल कांबळे, संतोष राठोड, सुभाष राठोड, नंदकुमार मोठेगावकर, पांडुरंग वाकडे, देविदास राठोड, दगडू राठोड, लखू राठोड, भालचंद्र बिराजदार, गणपती चव्हाण, बाबुराव भोसले यांच्यासह चारही प्रभागातील भाजपाचे प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंत्री श्री. नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते 'शिखर यात्री' लघुपट पोस्टर प्रकाशन संपन्न

**मुंबई/प्रतिनिधी** : सातपुड्याच्या अतिदुर्गम बालाघाट गावातील आदिवासी युवक अनिल मानसिंग वसावे यांच्या जागतिक शिखरांवरच्या प्रेरणादायी प्रवासावर आधारित 'शिखर यात्री एका आदिवासी युवा ब्रँड' या लघुपटाचे पोस्टर प्रकाशन अन्न व औषध प्रशासन मंत्री मा. श्री. नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते मंत्रालयात संपन्न झाले.



प्रकाशन प्रसंगी आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक अनिल वसावे, मीडिया एक्सपर्ट व दिग्दर्शक शंकर बारवे, निर्माती निशा बारवे, खाजगी सचिव डॉ. रामदास गाडे, विशेष कार्य अधिकारी प्रकाश सुपे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

अनिल वसवे यांनी आफ्रिका खंडातील माउंट किलीमांजारो, युरोपमधील माउंट एल्ब्रस, हिमालयातील सतोपंथ, कीअग्रीस्पँगनाग्री अशा अनेक शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. ते महाराष्ट्रातील आणि विशेषतः खानदेशातील पहिले आदिवासी गिर्यारोहक असून सध्या माउंट एव्हरेस्ट व माउंट ल्होत्से या दुहेरी 'अष्टहजारी' मोहिमेसाठी तयारी करत आहेत.

प्रकाशनावेळी मंत्री झिरवाळ म्हणाले, अनिल वसावे यांनी अतिदुर्गम भागातून अत्यंत हालाखीची परिस्थिती असतानादेखील केवळ जिद्दीच्या जोरावर जागतिक शिखरांवर पोहोचून आदिवासी समाजातील युवकांसाठी नवा आदर्श निर्माण केला आहे. 'शिखर यात्री' हा माहितीपट केवळ त्यांच्या यशाची कहाणी नाही, तर प्रत्येक वंचित भागातील तरुणाला मोठी स्वप्नं पाहण्याचं धाडस देणारा प्रेरणास्रोत आहे. अशा कार्यकर्तृत्वाला प्रोत्साहन देणे हीच खरी समाजसेवा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त करून अनिल वसावे यांना भविष्यातील सर्व मोहिमांसाठी शुभेच्छा दिल्या.

एस.बी. प्रोडक्शन प्रा. लि.च्या माध्यमातून दिग्दर्शक शंकर बारवे आणि निर्माती निशा बारवे यांनी हा माहितीपट साकारला असून लवकरच तो सोशल मीडियावर सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे.

आदिवासी युवक, विद्यार्थी आणि गिर्यारोहणप्रेमींसाठी हा लघुपट प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## रेशीम कोकून (रेशीम कोष) वाहतुकीतून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने गाठला महत्वाचा टप्पा

**सोलापूर/प्रतिनिधी** : पंढरपूर आणि कलबुरगि या रेशीम केंद्रांपासून ते आशियातील सर्वात मोठी रेशीम बाजारपेठ म्हणजेच कर्नाटकातील रामनगरमपर्यंत थेट संपर्क मालवाहतूक शक्य असून शेतकऱ्यांना किफायतशीर, थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनानुसार, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी पंढरपूरहुन आशियातील सर्वात मोठी रेशीम कोकून बाजारपेठ असणाऱ्या कर्नाटकातील रामनगरम येथे, थेट रेशीम कोष वाहतूक सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचण्याचा संकल्प करणाऱ्या समर्पित व्यवसाय विकास युनिट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित आहे.

कर्नाटकातील बेंगळुरू जवळील रामनगरम हे आशियातील सर्वात मोठे रेशीम कोष व्यापार केंद्र आहे. सोलापूर विभाग आधीच रामनगरमला ट्रेन क्रमांक १६५३६ पंढरपूर–म्हैसूर गोल गुंबज एक्सप्रेस आणि १७३०८ बागलकोट–म्हैसूर बसवा एक्सप्रेसने जोडलेला असला तरी, रामनगर येथे पाच मिनिटापेक्षा कमी वेळेचा थांबा असल्यामुळे सिल्क कोकन्स लवकर बुक करता आले नाहीत.

या समस्येचे निराकरण करण्यासाठी व शेतकऱ्यांना लॉजिस्टिक सहाय्य प्रदान करण्यासाठी, मध्य रेल्वे आणि दक्षिण पश्चिम रेल्वे यांनी संयुक्तपणे प्रयत्न केले. मध्य रेल्वेने लोडिंगचे काम केले तर दक्षिण पश्चिम रेल्वे ने अनलोडिंगचे काम केले, या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पहिल्यांदाच रेशीम कोष थेट बुकिंग शक्य झाले.

या नवीन सुविधेचा तात्काळ फायदा घेत, पंढरपूरमधील एका शेतकरी गटाने पहिल्याच दिवशी १,५०० किलो वजनाचे ३८ पोते रेशीम कोष बुक केले. यामुळे रेल्वेला एक नवीन महसूल स्रोत मिळाला, तसेच शेतकऱ्यांना प्रति किलो ५ रुपयांपेक्षा कमी किमतीत अत्यंत किफायतशीर वाहतूक पर्याय उपलब्ध झाला. रेल्वे आधारित वाहतूक ३०% पेक्षा जास्त स्वस्त तसेच रस्ते किंवा इतर वाहतुकीपेक्षा खूप वेगवान व सुरक्षित अशी आहे.

या नवीन सेवेमुळे आता पंढरपूर, सोलापूर आणि कलबुरगि ते रामनगरम पर्यंत रेशीम कोकूनची परवडणारी, एंड–टू–एंड वाहतूक शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल आणि लॉजिस्टिक्स खर्चात लक्षणीय घट होईल.

मालवाहतूकीत साधलेली प्रगती हि काही महिन्यांपूर्वी पंढरपूर आणि कलबुरगि येथे आयोजित केलेल्या अमृत संवाद कार्यक्रमांचे फलित आहे. रेल्वे मंत्रालयाच्या भागधारकांना जोडणारा हा उपक्रम असुन जिथे युनिट प्रमुखांनी अनौपचारिक पणे वापरकर्त्यांशी संवाद साधला आणि हे शक्य झाले. शिवाय भागधारकांशी थेट संवाद साधता आल्यामुळे विभागाला शेतकऱ्यांच्या गरजा जलद आणि प्रभावीपणे ओळखण्यास आणि पूर्ण करण्यास मदत झाली.



सोलापूर विभाग साखर उद्योगांव्यतिरिक्त देशातील एक प्रमुख फळ उत्पादक प्रदेश म्हणून सेवा देतो. कृषी–आधारित मालवाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी, कार्यक्षम आणि ग्राहक–अनुकूल रेल्वे सेवांद्वारे प्रदेशाच्या आर्थिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे.

सोलापूर रेल्वे विभागातून रामनगर कडे धावणाऱ्या गाड्यांचा तपशील:–
– १६५३६ गोल गुंबज एक्सप्रेस ही पंढरपूरहून दुपारी २:०० वाजता आणि सोलापूरहून दुपारी ३:३० वाजता रामनगरमकडे निघणारी दररोजची रेल्वे सेवा आहे.
– १७३०८ बसवा एक्स्प्रेस ही सोलापूरहून १९:३० वाजता आणि कलबुर्गीहून २१:१५ वाजता रामनगरमकडे जाणारी दैनिक रेल्वे सेवा आहे.

मध्य रेल्वेचा सोलापूर विभागाने रेशीम कोकून (रेशीम कोष) उत्पादक शेतकऱ्यांनी दैनंदिन रेल्वे सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी केले आहे.

## हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम निमित्त 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात रामेश्वर नाईक यांची विशेष मुलाखत

**मुंबई/प्रतिनिधी** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात 'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम' निमित्त हिंद–दी–चादर श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० व्या शहिदी समागम समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

दिलखुलास कार्यक्रमात ही मुलाखत शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर ऐकता येईल. ही मुलाखत 'News On AIR' या मोबाईल ॲपवरही उपलब्ध राहणार आहे. तर 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, २ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर पाहता येणार आहे. तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर देखील पाहता येईल. निवेदक सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

X (Twitter): https://twitter.com/MahaDGIPR

Facebook: https://www.facebook.com/MahaDGIPR

YouTube : https://www.youtube.com/MAHARASHTRADGIPR

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथे अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग, महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रचार–प्रसार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, २१ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तर, २४ जानेवारी २०२६ ला नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे स्वरूप, अंमलबजावणी व राबविण्यात येणारे विविध उपक्रम याविषयी राज्यस्तरीय शहिदी समागम समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिलखुलास आणि जय महाराष्ट्र या कार्यक्रमातून सविस्तर माहिती दिली आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# दहिफळ येथे श्री खंडोबा यात्रा भक्तीभावात आणि उत्साहात पार



येरमाळा (प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील दहिफळ गावातील ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक रितीरिवाज जपत संपन्न झाला. यात्रेची मुख्य पूजा आज (दि. २७) दुपारी २ वाजता श्री खंडोबा मंदिरात विधिवत पार पडली. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात खंडेरायाची महापूजा झाल्यानंतर देवाला नैवेद्य दाखविण्यात आला. यानंतर समाजप्रबोधनाच्या हेतूने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक सोंगे मंदिर परिसरात सादर करण्यात आली.

परंपरेनुसार रामायण, महाभारत, शिवपुराण यांतील प्रसंग, आदिवासी व बंजारा समाजाच्या परंपरा, चालीरीती आणि त्यांच्या दैनंदिन जीवनाचे दर्शन घडविणारी सोंगे मांडण्यात आली. या सोंगांमधून आजच्या युवा पिढीला एक सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ढोल-ताशांचे निनाद, पारंपरिक वाद्यांचे सूर आणि फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर भक्तीमय आणि उत्साहपूर्ण बनला. 'यळकोट यळकोट घे'च्या घोषणांनी वातावरण अधिकच उत्साहात भर घातली. मिरवणूक मंदिरापासून सुरू होऊन गावातील प्रमुख मार्गांनी फिरली. यावेळी भाविकांच्या उपस्थितीने रस्त्यांवर प्रचंड गर्दी झाली होती. मिरवणुकीनंतर मंदिराला पाच प्रदक्षिणा घालून धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले. यात्रेच्या ठिकाणी लहान मुलांसाठी खेळणीची दुकाने, नारळ भांडार, रहाटपाळणा, घसरगुंडी, जाळीवरील उड्या, गोल फिरणारी गाडी अशी विविध मनोरंजनात्मक साधने उभारण्यात आली होती. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी यात्रेचा मनसोक्त आनंद लुटला. दहिफळसह पंचक्रोशीतील शेकडो भाविकांनी या यात्रेला हजेरी लावली. धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक विविधता आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणाऱ्या या यात्रेमुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यात्रेत पंचक्रोशीतील भाविकांची गर्दी दहीफळ येथिल श्री खंडोबा यात्रा महोत्सव हा परिसरातील नवचैतन्य निर्माण करणारा सण असून या सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांसह नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी होत असतात. येथील खंडोबा यात्रा महोत्सव म्हणजे सर्व जाती धर्मातील नागरिकांना एकतेचा संदेश देणारा आहे. या महोत्सवामध्ये प्रत्येक घरातील लहान मोठ्याने एकमेकांचा आदरसन्मान ठेवत विना पोलिस बंदोबस्तामध्ये यात्रा शांततेत पार पडली जाते. ही यात्रा महोत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण गावासह पंचक्रोशीतील ग्रामस्त स्वतः यात्रा महोत्सव समितीकडे वर्गणी जमा करतात.

# रुईभर चेअरमनपदी भाजपाचे धनंजय चव्हाण तर व्हा.चेअरमनपदी सौ. निलावती वडवले यांची बिनविरोध निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- रुईभर ता. धाराशिव येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी दरवर्षी एकास संधी अशा पद्धतीने भारतीय जनता पार्टीचे धनंजय चव्हाण यांची चेअरमन म्हणून तर सौ निलावती रोहिदास वडवले यांची व्हाईस चेअरमन म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी डॉ . आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगवानआबा गुलाबगिरी महाराज यांच्या वतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष (दादा) कोळगे, सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापक शिवाजी पवार, आगतराव भोईटे राजाराम कोळगे, रामदास कोळगे, शशिकांत कोळगे, बालाजी कोळगे, पांडुरंग कोळगे, नवनाथ गव्हाणे, मारुती कस्पटे, हरिदास गव्हाणे, पांडुरंग आगळे, बाबासाहेब कोळगे, नानासाहेब पवार, शाहूराज मते, राजेंद्र गव्हाणे, अशोक सिरसाठे, दत्तात्रय बनसोडे, अशोक गव्हाणे, दशरथ कस्पटे, अमर भोईटे, महादेव शिंपले, बालाजी वडवले, प्रशांत कोळगे, बालाजी चव्हाण, संजय भोईटे, महादेव मते, सचिन गव्हाणे, दिलीप कोळगे, संपत वडवले, अमोल कलाल, तेजसिंह कोळगे, ओंकार कोळगे, नवनाथ शेरखाने यांची उपस्थिती होती. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए .आर सय्यद तर सहाय्यक म्हणून नानासाहेब कदम यांनी कामकाज पाहिले.

# वैध वाहतूक अन् निकृष्ट कामामुळे वाशी मधील रस्त्यांची बिकट अवस्था



वाशी (प्रतिनिधी)- वाशी तालुक्यातील दळणवळणाचा कणा मानल्या जाणाऱ्या रस्त्यांची स्थिती दिवसेंदिवस अत्यंत दयनीय होत चालली आहे. परिणामी नागरिकांना खड्डेमय रस्त्यांतून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. तालुक्यातील सुमारे ५४ गावांना शहराशी आणि एकमेकांशी जोडणारे जवळपास ४५० किमीचे रस्ते आहेत. यामध्ये जिल्हा परिषद विभागाचे २८७ किमी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे १४२ किमी तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील काही रस्त्यांचाही समावेश आहे. सध्या हे सर्व रस्ते अक्षरशः खड्ड्यांचे जाळे बनले आहेत. काही रस्त्यांची कामे निकृष्ट झाल्यामुळे ती लवकरच खराब झाली. त्यातच यावर्षी झालेल्या सलग पावसामुळे व अतिवृष्टीने रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली आहे. अति पावसामुळे अनेक रस्त्यांवरून नदीप्रमाणे पाणी वाहू लागले. जोरदार प्रवाहाने आधीच खराब असलेले रस्ते वाहून गेले, तर चांगल्या रस्त्यांवर पाणी साचून ते खचले. यात अधिक भर घातली ती अतिवजनी पवनचक्की साहित्य वाहतूक करणाऱ्या वाहनांनी, तसेच मुरुम-वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांनी. वजन क्षमता १०० ते १५० पट जास्त असलेली वाहने चोरीछुपे अंतर्गत रस्त्यांचा वापर करत असल्याने रस्ते पूर्णपणे उखडून गेले आहेत. या परिस्थितीचा प्रत्यक्ष परिणाम शहरातील बाजारपेठेच्या उलाढालीवर दिसू लागला आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांत खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून अनेक जणांचा मृत्यू झाला असून काही अजूनही उपचार घेत आहेत. नागरिक कररुपी लोकवाटा भरत असतानाही त्यांना जीवघेण्या रस्त्यांचा सामना करावा लागत आहे. शहरात तहसील कार्यालय, पंचायत समिती, स्वतंत्र कारभार नसल्याने अडचण तालुक्यात येत असलेल्या ४५० किमी रस्ते हे तीन विभागाकडे विभागलेले आहेत. ज्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभाग सोडले तर जिल्हा परिषद, पंतप्रधान ग्राम सडक योजना याचे कार्यालय नाहीत अथवा त्याचे अधिकारी कोण? देखील कोणाला माहिती नाही. नागरिकांनी दाद मागायची कोणाकडे हा प्रश्न पडलेला आहे. त्यात कार्यालय अथवा अधिकारी वाशीला नसल्याने मोठी अडचण होत आहे. १० दिवसांत दुरुस्ती करू रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत सबंधित गुत्तेदार यांना पत्रे काढून सूचना केल्या आहेत. पंतप्रधान ग्राम सडक योजना शहराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर तालुक्यातील बहुतांश गावे येत असल्याने ते जरी चांगले असतील तरी काही प्रमाणात गैरसोय दूर होऊ शकते. ज्यामध्ये वाशी ते कळंब ज्यामध्ये मांडवा, पिंपळगाव, गोजवडा,इंदापूर या मार्गांचा समावेश होतो. तर भुसार व आरोग्यसेवा यासाठी सोलापूर जिल्ह्यातील बार्शीला जोडणारा कडकनाथवाडी रस्ता,पारा ते वाशी, कण्हेरी मार्गे भूम, साखर कारखान्याला जोडणारा तांदुळवाडी रस्ता, पारा ते कळंब हे मुख्य रस्ते तरी सुस्थितीत असणे गरजेचे आहे. मुदतीत असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती सुरू केली नाही. मात्र या रस्त्यांची अवस्था तर पूर्वी या ठिकाणी रस्ते होते काय हा प्रश्न निर्माण करणारी झाली आहे. रस्त्याची आवस्था बिकट झाली आहे हे नक्की!

# मोटरसायकल पाठीमागून धडक दिल्याने गंभीर जखमी होऊन मृत्यू

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-बलभिम विश्वनाथ बारकुल, वय ६५ वर्षे, रा. बाजार चौक येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२०.१०.२०२५ रोजी मोटरसायकल क्र एमएच २५ ए.आर. २९४० वरुन जात होते. दरम्यान सुर्या लॉजचे समोर येरमाळा ते बार्शी रोडवर महिंद्रा टॅम्पो क्र एमएच २५ ए.जे. ८६०९ चा चालकाने त्यांचे ताब्यातील टॅम्पो हा चालवून बलभिम बारकुल यांचे मोटरसायकल पाठीमागून धडक दिली. या अपघातात बलभिम बारकुल हे गंभीर जखमी होवून मयत झाले. नमुद टॅम्पो चालक हा जखमी उपचार कामी घेवून न जात व अपघाताची खबर न देता निघून गेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-निलेश बलभिम बारकुल, वय ३२ वर्षे, रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१), १२५(अ) १२५ (ब),३२४,(४) (५) सह १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

झाडे लावा!    झाडे जगवा!!    झाडे तोड रोखा !!!

# सिमुरगव्हाणाला ४ डिसेंबरला दत्तजयंती उत्सव व रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे प्रवचन !

कळंब रामानंदचार्यांच्या दक्षिणपीठ नाणीजधामच्या सिमुरगव्हाण (जि. परभणी) उपपिठावर ४ डिसेंबर २०२५ रोजी श्री दत्तजयंती वारी उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठवाडा पीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, पीठ सहप्रमुख विजय देशपांडे, व्यवस्थापक सुरेश मोरे, यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये उपक्रमामध्ये ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, १६२ जणांचे मरणोत्तर देहदान, आता पर्यंत ९० अवयवदान, मोफत रुग्णवाहिका सेवा, महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत मोफत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिर या वर्षी जानेवारी मध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून अवघ्या १५ दिवसांमध्ये १,३६,२७९ रक्त कुपिंकांचे संकलन करण्यात आले, ब्लड इन नीड, एक पेड माँ के नाम वृक्षारोपण उपक्रमांतर्गत १,१०,६८७ वृक्षारोपण नोव्हेंबर २०२५ महिन्यांमध्ये करण्यात आले, इत्यादी उपक्रम आयोजित केले जातात.



या वारी उत्सव कार्यक्रमाच्या अनुषंगाने सामाजिक उपक्रमांतर्गत गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत दुचाकी सायकल वाटप हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. संध्याकाळी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या अमृतमय प्रवचनाचे आयोजन केलेले आहे.

या कार्यक्रमासाठी उपपीठ मराठवाडा अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनी दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी दत्त जयंती वारी उत्सव व जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा. या सोहळयासाठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रमाच्या दिवसी २४ तास महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महन्मंगल समयी सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून परमश्रद्धेय रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रवचन व दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन मराठवाडा पीठ समिती, जिल्हा सेवा समिती यांनी केले आहे.

# अवैध मद्य जप्त करुन गुन्हे दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत ओम रा.वाणी हंद्राळ ता.उमरगा जि. धाराशिव हे दि.२७.११.२०२५ रोजी . सुमंगरुळ ते अक्कलकोट जाणारे रोडचे कडेला अंदाजे १,२८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंध बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर अभिजी रा.देवसिंगा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२७.११.२०२५ रोजी बालाजीनगर देवसिंगा पाटी येथे अंदाजे १,७०० किंमतीची १७ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर कृष्णाथ रा.मंगरुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२७.११.२०२५ रोजी १८.०० वा. सुमंगरुळ ते खंडाळकरवाडी जाणारे रोडचे बाजूला चिंचेचे झाडाखाली अंदाजे २,९०० किंमतीची २९ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI BUILQUIS BEGUM FASIODDIN**
TO: **BILKIS FASIYODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **KAZI BUILQUIS BEGUM FASIYODDIN** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI BUILQUIS BEGUM FASIODDIN**
NEW NAME :- **BILKIS FASIYODDIN KAZI**
Address - Kazi Galli Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-290546862442 Mob.9158608538

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **CHAVAN ASHOK SUBASH**
TO: **ASHOK SUBHASH CHAVAN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **CHAVAN ASHOK SUBAHS** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **CHAVAN ASHOK SUBAHS**
NEW NAME :- **ASHOK SUBHASH CHAVAN**
Address - IndraNagar Hagarga Bal Taluka Tuljapur
DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-949607503846 Mob.9850340555

## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649